म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2498

# वैशाख धन



अरुण 6197
REFBK-0024362
REFBK-0024362

कवी यशवंत पारखी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९४
दा. क. २७.३.६२
काव्य ४६।१०।३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ ग्रन्थ
2498
28362
2470108

# रक्षाबंधन

( श्री. गणेशसाहित्यधारा–२ )
१९८४

## कविता

REFBK-0024362
REFBK-0024362

यशवन्त पारखी

रक्षाबंधन (कवितासंग्रह) – यशवन्त गणपतराव पारखी

सर्व हक्क प्रकाशिकेचे स्वाधीन

पत्रव्यवहार :– सौ. विजया यशवंत पारखी
प्रकाशिका, श्रीगणेश साहित्यधारा :
सी / १ सी६, पोस्टल कॉलनी,
सहार रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००९९

मुद्रक : मे सुभाष रमाकांत दिघे
कमलकांत मुद्रणालय,
सर्व्हे नं. १३० दांडेकर पूल पुणे ३०.

वेष्टन : श्री अरुण ठाकूर, G. D. Art ठाणे

किमत १५ रुपये

**आषाढासम सांवळे स्वरुप हे, स्नेहार्द्र ओथंबले;**
**भांगातून उषा गुलाल उधळे, भाळावरी गोंदले.**

**प्रिय सौ. श्यामलाताईस :**

करीं एवढा अक्षरांचा पुरावा
तुझ्या भावकोषांतुनी ठेवतो,
विचारुन घे, शब्द झाल्या व्यथेला,
निलाकाश, जेथे तुला पाहतो,

**-- यशवन्त पारखी**

# मंगलदिनीं तनुमनधन दान करीते

खरं म्हणजे ' रक्षाबंधन ' १०–१२ वर्षांपूर्वीच छापून व्हायला हवं होतं. सर्व आराखडा तयार झाला होता, परंतू आमच्या व्यक्तिगत अडचणींमुळे प्रत्यक्ष काम हाती घ्यायला सारखें लांबणीवर पडत होते. कविता अनेक ठिकाणी प्रसिद्ध होत होत्या. श्री. पारखींच्या कवितावाचनाच्या कार्यक्रमानंतर रसिक पुस्तकाची विचारणा करीत. श्री. पारखींची तगमग दिवसेंदिवस वाढत होती. एक प्रयत्न म्हणून ग्रंथालीला हस्तलिखित सादर केले. योग्यवेळी ग्रंथालीकारांनी कवितांच्या गुणांबद्दल मान तुकवून संमति दर्शवली परंतू केवळ त्यांच्या आर्थिक मर्यादांमुळे पुन्हा विलंब लागणार होता. थोडी जुळवाजुळव करून मग आम्हीच या मंगल कार्याला हात घातला.

श्री. पारखींचं पहिलं ' पुष्पगंधा ' आम्हीच खाजगीत छापलं. पहिलेपणांच्या सऱ्या चुका त्यांत आहेतच. तो अनुभव गांठीशी होताच. अनेकांचे या क्षेत्रांतले कडु अनुभव आम्ही ऐकतो, पेपरमध्ये वाचतो. कशी असेल ती असो पण ' पुष्पगंधेनं आम्हांला निराशेचा जरासुद्धा वारा लागू दिला नाही. हं ! कष्ट मात्र भरपूर झालेत. भंडाऱ्यासारख्या आडगांवी पुष्पगंधा छापून लगेच आम्ही बदलीमुळे मुंबईच्या महासागरांत आलो आणि अनेक जीवघेण्या महाकाय लाटा, भोवरे चुकवत, पाणी कांपत इथंवर आलो. आम्ही कवितेचं दुसरं पुस्तक काढतो आहोत हीच बाब बरंचसं सांगून जाते, नाही का ? अर्थात् ही सारी कवितादेवतेचीच कृपा आहे ही आमची भाबडी श्रद्धा.

' रक्षाबंधनासाठी ' सुद्धा आमच्या जवळ केवळ कष्टाचंच भांडवल आहे. खर्चाचा अर्धा अधिक वाटा मुंबई ठाणे, नागपूर, आणि इतरत्र पसरलेल्या पारखीच्या अनेक रसिक मित्रांनी आगाऊ पैसे देऊन उचलला आहे. अनेकांनी प्रतीची मागणी सांगून ठेवली आहे. या व्यतिरिक्त अन्य कुठलेही अनुदान या पुस्तकाला नाही. रक्षाबंधनाची बरीचशी कामं पैशावांचून केवळ आमच्या व कवितेवरील प्रेमानं झालेली आहेत त्यामुळे पुस्तकाची किंमत माफक ठेवली आहे. आमचे जवळ सुसंघटित अशी वितरण व्यवस्था नसल्याने शक्य

तो पुस्तक थेट वाचकापर्यंत पोचविण्याचा आमचा प्रयत्न असतो. कांही मान्यवर बुक डेपो वितरण विक्रीसाठी साहय करणार आहेत. अनेक गांवो-गांवच्या रसिक मित्रांनी १०-१२ प्रती खपविण्याचे मनांवर घेतले आहे त्यामुळे विक्रीची समस्या आमचेपुढे नाहीच नाही. त्यामुळे भरमसाठ किंमत ठेवून मग सवलत योजना वगैरे नकोच.

रक्षाबंधनाची गुंफण करतांना अनेकांचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष साहय झाले आहे श्री. विजयानंद लक्ष्मणराव पराडकर, कल्याण, सौ. मंजिरी मनोहर तळेकर, ठाणे, श्री. अरूण ठाकूर G. D. Art. ठाणे, कविवर्य म. पां भावे, ठाणे, कागदाचा जटिल प्रश्न सोडवून उत्तम दर्जाचा कागद स्वस्त दराने उपलब्ध करून देण्यासाठी श्री. मुंदडाजी ( O. C TMG ) मुंबई व श्री. सोढाणीजी ( वेस्ट कोस्ट पेपर्स लि. ) मुंबई, छपाईसाठी श्री. अण्णा दिघे, ( कमलकांत मुद्रणालय ) पुणे, शिवाय बंधुभगिनींच्या प्रेमाच्या ह्या स्तोत्राचा परिचय करुन देणाऱ्या कवयित्री प्रा. शांता शेळके आणि सुरवाती पासून शेवट पर्यंत रक्षाबंधनाची तत्परतेने पाठराखण करणाऱ्या रसिकवर्या सौ. उषाताई पेंडसे ठाणे, या साऱ्यांचे श्रेय अत्यंत विनम्र भावनेने मी कबूल करते.

श्रीगणेश साहित्यधारेचं हे दुसरं पुस्तक. तिसरं आषाढ-श्रावण छपाईला गेलं आहे. फारसा पसारा न वाढवतां मोठ्या उद्योग प्रकल्पाचा आव न आणतां, मांडलेली आमची ही भातुकली. कुणाशी स्पर्धा, मराठी कविता क्षेत्रांत क्रांती वगैरे मुळीच नाही. व्यावहारिक नफा-तोटयाची गणितं सुध्दा नीटपणे मांडलेली नाहीत. पण स्वत: पुस्तक छापण्यात कष्टा-व्यतिरिक्त एक अवर्णनीय आनंद असतो. मुखपृष्ठ, कागद, छपाई वगैरेत स्वातंत्र्य असतं. असो. श्री रसिकांनी आमची सेवा रुजू करून घ्यावी ही नम्र प्रार्थना.

आजच्या ह्या मंगलदिनी सर्वांनी तनु मन धन खर्चून गुंफलेल्या ' रक्षाबंधनांतील ' भावमधूर कवितांनी प्रिय सौ. श्यामलाताईंची, आपणां मान्यवर रसिकांच्या साक्षीने, ओटी भरते.

गुढीपाडवा,
चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १९०६
दिनांक २ एप्रील १९८४

आपली नम्र
प्रकाशिका
सौ विजया पारखी
' श्रीगणेश साहित्यधारा '

# बंधूभगिनींच्या प्रेमाचे हें स्तोत्र

'रक्षाबंधन' संग्रहाचे कवी यशवंत पारखी यांचें नाव माझ्या कानांवरून गेले होते. त्यांच्या कांही कविता क्वचित वाचल्या होत्या. 'सत्यकथे' सारख्या प्रतिष्ठित वाङ्मयीन मासिकानेही त्यांच्या कवितांना एकदानदां प्रसिद्धी दिल्याचे अंधुक आठवत होते. तरी देखील 'कवी' म्हणून पारखी यांची कांही निश्चित प्रतिमा डोळ्यांसमोर नव्हती. तशी प्रतिमा तयार व्हावी अशी पारखी यांची व्यावहारिक किंवा वाङ्मयीनही रूपरेखा नाही. ते कुठल्याही अर्थाने 'प्रथितयश' वगैरे नाहीत. आणि कवितालेखन हा अद्याप त्यांनी आपला 'व्यवसाय' ही केलेला नाही. व्यासपीठावरून कविता सादर करणाऱ्या कवींत ते सहसा दिसणार नाहीत दिवाळी अंकांतून त्यांची हजेरी सातत्याने लागलेली आढळणार नाही. इतकेच नव्हे तर एखाद्या साहित्यिक वर्तुळांत त्यांची नित्याची ऊठबस असावी असेही मला जाणवले नाही. पारखी यांचे कवितेवर निरपेक्ष, निर्हेतुक आणि निर्मळ प्रेम आहे. त्या प्रेमापोटी त्यांच्या आजवरच्या कवितांची निर्मिती झालेली आहे. आणि कवितेशी असणारे येवढे नाते त्यांना पुरेसे वाटते. त्यापेक्षा अधिक त्यांचा कसला दावा नाही. कसला आग्रह नाही पण त्यामुळेच की काय, पारखी हे खऱ्या अर्थाने जातिवंत कवी आहेत. कविता हे त्यांचे व्रत आहे. तो एक काळजाला जाऊन भिडलेला आणि तिथे रुतून राहिलेला त्यांचा छंद आहे.

पारखी यांची आणि माझी प्रत्यक्ष भेट झाली त्यावेळी त्यांच्याशी गप्पा मारताना त्यांची मला पटलेली ओळख ही अशी आहे. त्यांच्या एकूण वृत्तीत उत्कट काव्यप्रेम मला दिसून आले त्याबरोबरच स्वतःच्या कवितेकडे बघणारी त्यांची निकोप दृष्टीही मला जाणवली. पारखी हे तसे कोणी नामवंत वगैरे कवी नाहीत, पण अलिकडे अगदी नवशिक्या कवीमध्ये देखील चलाख धूर्तपणा, सावध व्यवहारचातुर्य, प्रसिद्धीसाठी जाणीवपूर्वक पवित्रे घेणे, इतर प्रतिष्ठित कवींबद्दल तुच्छतेने बोलणे, अल्पावकाशांत स्वतःची

'इमेज' बनवण्यासाठी धडपडणे इत्यादि गोष्टी दिसून येतात. अशा कवींच्या तुलनेने यशवंत पारखी यांच्या स्वभावातला साधेपणा, ऋजुता मला फार आकर्षक वाटली. ते मध्यमवयीन आहेत हे त्यांच्या शांतपणाचे एक कारण असावे. पण मुळांतच कुठेतरी एक अंगभूत सुजाणपणा असल्याखेरीज कवीच्या ठायीं आपल्या कवितांबद्दल इतकी अनाग्रही वृत्ती संभवत नाही.

पारखी यांचा एक कवितासंग्रह आधी प्रकाशित झालेला आहे. 'रक्षाबंधन' हा त्यांचा दुसरा कवितासंग्रह या संग्रहात एकूण तेहतीस कविता आहेत. वर वर पाहातां यांतली प्रत्येक कविता सुटी, स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण आहे. परंतु हा संग्रह सलग वाचला तर ध्यानांत येते की, या कवितांमधून एका कहाणीचे सूत्र गुंफलेले आहे. हा रचनाप्रकार मराठी कवितेला तसा नवा नाही. व्यासंगी रसिकांना प्रस्तुत कवितासंग्रह वाचतांना रविकिरण मंडळांतल्या दोन ख्यातनाम कवींचे काव्यग्रंथ सहज आठवतील. यशवंत यांची 'जयमंगला' आणि माधव ज्युलियन यांचे 'तुटलेले दुवे' हे ते संग्रह. 'जय मंगला' मधली प्रत्येक कविता स्वयंपूर्ण आहे. पण त्या बरोबरच त्या सर्व कवितांमधून एक प्रेमकहाणी उलगडत जाते. ही कहाणी बिल्हण हा काश्मीरदेशीय पंडित कवी आणि त्याची रूपसुंदर प्रेयसी शशिलेखा यांच्या प्रेमकथेवरून यशवंतांना स्फुरलेली आहे. 'तुटलेले दुवे' ही एक सुनीत मालिका आहे. इथेही प्रत्येक सुनीत आपापल्या परीने स्वतंत्र, संपूर्ण आहे. पण सर्व सुनीतें वाचल्यावर त्यांमधून 'शारदाकिंकर' हा कवी आणि त्याची प्रेयसी शारदा यांची विफल प्रेमकथा कवीने गुंफिली आहे असे दिसून येते. पारखी यांचे 'रक्षाबंधन' हेही वरील काव्यांच्या मालिकेत बसणारे काव्य आहे. हे साम्य अर्थात रचनाविशेषापुरते, मर्यादित अर्थानेच घ्यावयाचे. इथंही प्रत्येक कविता सुटी, स्वतंत्र आहे. पण सर्व कवितांमधून एक कथा उमटत जाते. फरक इतकाच की वरील दोन्ही प्रेमकहाण्यांपेक्षा इयली कहाणी वेगळी आहे. हीहि तशी प्रेमकहाणीच पण हे प्रेम प्रियकर प्रेयसींचे नसून बंधुभगिनीचे आहे. संग्रहाचे 'रक्षाबंधन' हे नांव त्या दृष्टीने

सूचक व समर्पक आहे,

'रक्षाबंधन' ही निर्मळ आणि पवित्र बंधुभगिनी प्रेमाची गाथा आहे. इथल्या कविता वाचताना या कहाणीचा पट हळूहळू आपल्या डोळ्यांसमोर उलगडू लागतो. त्यांतले अनेक तपशील स्पष्ट होतात. आणि त्यांतून भाऊ व बहीण या दोघांचीही ओळख आपल्याला पटू लागते. कवितांतल्या वेग-वेगळ्या संदर्भावरून हा भाऊ म्हणजे स्वतः कवीच आहे हे ध्यानांत येते- त्याचे आपल्या बहिणीवर उत्कट प्रेम आहे. सुरवातीला हे प्रेम बहिणीच्या बाजूनेही तितकेच जिव्हाळ्याचे असते. तथापि या नात्यांत एक चमत्कारिक पेंच आहे. ही भावंडे सहोदर नाहीत. त्यांचे नाते मानीव आहे. हा परिचयही बहुधा प्रौढ वयांत झालेला असावा. भाऊ कवी आहे. तशी ही बहीणही विदुषी, रसिक वृत्तीची कवितेत रमणारी आहे. तिचे विचार उच्च आहेत आणि वाचनाची तिला खूप आवड आहे. या समान अभिरूचीमुळे, काव्य-प्रेमामुळें उभयतांचा परिचय होतो. लौकरच त्या परिचयाचे गाढ जिव्हा-ळ्यांत रूपांतर होते. कवी त्या विदुषीला आपली बहीण मानतो. 'सारे मंगल स्नेहभाव बघुनी भगिनी तुला मानले' असे तो म्हणतो. बहिणीलाही या आपल्या मानलेल्या भावाबद्दल अंतरीची ओढ आहे. पण ती एक स्त्री आहे. त्यांतून ती विवाहिता आहे. जनरूढी, जननिंदा यांना भिणारी आहे. कदाचित या संदर्भात तिला जगाकडून काही विपरीत अनुभवही आला असेल मग स्त्रीच्या विचित्र स्वभावानुसार ती भावावरच उलटते. जगाचा राग ती त्याच्यावर काढते आणि त्याच्या शुद्ध हेतूचा विपर्यास करून ती कठोर शब्दांनी त्याला ताडन करते—

"आम्ही सभ्य, प्रतिष्ठितांत असतो, संसार आहे मला
जननिंदा विपरीत, लोक हंसती, तुम्ही कसें वागतां ?
ना कळती कविता अम्हांस तुमच्या खोट्या, खुळ्या, वल्गना,
तुम्ही येउ नका पुन्हा मजकडे, दुसऱ्या कुठे दाखवा."

यावर भाऊ अतिशय दुःखी होतो. तो इतकेच म्हणतो,

" झाले काय असे अचानक तुम्हां ? कांही कुणी बोलले ?
माझा काय प्रमाद ? मी तर तुम्हा भगिनीपरी मानितो–"

त्यावर ताई पुन्हा निष्ठुरपणे उत्तर देते–

" भगिनी प्रेम असो तुम्हांस तुमचे लखलाभ आम्हां नको
जा, जा, येउ नका पुन्हा मजकडे, लोकांस सांगू कसे ?"

इथून पुढे उभयतांच्या स्नेहांत एक विचित्र तणाव निर्माण होतो. बहीण भावाशी असलेले सारे संबंध तोडून टाकते. भाऊ दुखावतो. 'परकाच मी शेवटी ' असे उद्‌गार त्याच्या मुखावाटे प्रकटतात. जिला आपण थोरली बहीण मानले तिने त्या नात्याचे रेशीमधागे असे तोडून टाकावेत याची त्याला विलक्षण खंत वाटते. तो म्हणतो–

ना जगाची मान्यता तूं संशयाने वेढली,
मी असा परका खरोखर तूं पुन्हा म्यालीस ना ?
कूस एका आईची आम्हांस नाही लाभली
येवढ्याशा कारणाने रान हे जळतेच ना ?

हे त्याचे करूण उद्‌गार कुणाच्याही काळजाला भेदून जातील ! ताई भावाला इतकी दुखावते की एकदा. तो पालीला तिच्या घरी तिला भेटण्यासाठी जातो तेंव्हा ती त्याला घरांत देखील घ्यायला तयार होत नाही.

शिशिराचे ऊन्ह सांगे
गोपुराच्या कळसाला,
' पहा एका बहिणीला
भेटायला भाऊ आला '

पण प्रत्यक्षांत काय घडते ? भाऊ –

भिरभिर न्याहाळत
दारामध्ये उभा राही,
तेंव्हा ताई म्हणाली की,
' इथे तुझे कुणी नाही '

भावाचे काळीज दुभंगून जाते. आणि तो म्हणतो –

सांगायला आलो होतो
सारा मान–अपमान
काय माझा अपराध
गेलीस तूं रागावून.

बहिणीच्या अशा बर्तनाने हा भाऊ दुखावला तरी त्याला तिचा राग येत नाही. तिच्याविषयी त्याचा गैरसमज होत नाही. त्याच्या बाजूने सारे प्रेम, सारा जिव्हाळा पूर्वीइतकाच उत्कट राहातो. आणि त्याच उत्कटतेने बहिणीकडून कधी तरी संशयाचें धुकें वितळून तिच्या प्रेमाचा प्रतिसाद आपल्याला पुन्हा मिळेल अशी आशा तो मनांत बाळगून राहातो. आपले मनोगत कवितेद्वारा व्यक्त करीत राहातो.

'रक्षाबंधन'चे कथासूत्र थोडक्यांत हे असे आहे. स्नेह–प्रेम–अपसमज–दुरावा अशा मार्गाने हे काव्य उलगडत जाते. मानीव बंधुभगिनींचे प्रेम ही कल्पना भारतीय मनाला तरी नवी नाही. कृष्ण आणि द्रौपदी ही सहोदर भावंडे नव्हती. तरी त्यांचा उत्कट जिव्हाळा सर्वपरिचित आहे. अनेक कथांना, काव्यांना त्या जिव्हाळ्याने विषय पुरविले आहेत. 'रक्षाबंधन' मधल्या भावाचे आपल्या मानीव बहिणीवरचे प्रेम हे त्याच जातीचे आहे. या प्रेमाचे विविध आविष्कार हाच 'रक्षाबंधन' काव्याचा मध्यवर्ती विषय आहे. या अविष्काराचे अनेक मनोरम विशेष आहेत. त्यांचा निर्देश करायचा आहेच. पण त्यापूर्वी या काव्यामध्ये ज्या दोन त्रुटी जाणवतात त्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. यांतली एक त्रुटी अशी की इथली ताई ही एक हाडामासाची जिवंत व्यक्ती म्हणून फारशी जाणवत नाही. तिची निश्चित नेमकी आकृती डोळ्यापुढे उभी राहात नाही. तिच्या व्यक्तिमत्वाचे कांही तपशील कवी देतो. उदाहरणार्थ ती 'विदुषी' आहे, तिचे 'विचार उच्च' आहेत. ती 'शील चारित्र्यसंपन्न सती' आहे. तिचे शब्द 'प्राजक्त पुष्पा' सारखे आहेत. तिच्या रोमारोमांत 'स्नेहार्द्रतेचा सांवळा श्रावण' दाटला आहे. पण हे वर्णन कितीही कल्पनारम्य असले तरी त्यांतून ताईची निखळ प्रतिती आपणांस क्वचितच येते. हा सर्व तपशील कल्पनेच्याच पातळीवर राहातो.

भांगांत केशरी पूर्वा
माथ्यावर वर्तुळ कुंकू,
किंचीत जरासा खाली
रुसलेला हिरवा बिंदू

अशा ओळींतून देखील कवींची कल्पकताच फक्त जाणवत राहाते. अगदी साध्या तपशीलांतून ताईचे रंगरूप, तिचे हंसणे बोलणे, तिचे सहज हावभाव–थोडक्यांत तिची जिवंत प्रतिमा आपणांसमोर उभी करण्यात कवी व्हावा तेवढा यशस्वी झाला नाही असे म्हणावे लागते.

या काव्यांत आणखी एक उणीव जाणवते, ती आत्मपर निवेदनामुळें निर्माण झाली आहे. हे सर्व काव्य भावाच्या आत्मनिवेदनातून आकाराला आले आहे. त्यांत क्वचित ताईचे कांही उद्‌गार उद्‌धृत केले आहेत. तिचे कांही वर्तन, कांही कृती यांचे चित्रण आहे. तरीही ताईची बाजू इथे आपणांस कळत नाही. ती स्त्री आहे. विवाहित, संसारी गृहिणी आहे. आधीच स्त्रियांच्या बाबतीत समाज साशंक असतो त्यांच्या बारीक सारीक गोष्टीवर देखील तो डोळ्यांत तेल घालून पहारा ठेवीत असतो. आणि आपण कितीही सुधारलो, सुशिक्षित झालो, प्रगत झालो तरी अद्यापही स्त्री पुरुषांचा मोकळा स्नेह समाजाला रुचावा तसा रुचत नाही. मानलेल्या बंधुभगिनीच्या नात्याकडे बघण्याची लोकांची दृष्टी अद्यापही फारशी उदार नाही. त्यामुळे ताईचे भावाशी होणारे वर्तन निष्ठुरपणाचे वाटले तरी तिची म्हणूनही कांही बाजू असेल हे ध्यानांत घ्यायला हवे. इतकेच नव्हे तर विशिष्ट दृष्टिकोनांतून तिच्या वागण्याचे समर्थन देखील करतां येण्यासारखे आहे. ती बाजू–हे काव्य केवळ भावाचे आत्मनिवेदन असल्यामुळे–कळावी तेवढी आपणांस कळत नाही. अर्थात हा कवीचा दोष नाही. त्याने इथे जी आत्मनिवेदनात्मक पद्धती अवलंबिली आहे तिचा तो दोष आहे.

या त्रुटींबरोबर भाषेच्या व शैलीच्या दृष्टीनेही कांही गोष्टी या काव्यांत खटकतात. यशवंत पारखी हे वृत्तरचना करतात. ही गोष्ट मला अर्थातच अभिनंदनीय वाटते. नव्या मुक्त रचनेचा स्वीकार करण्याच्या उत्साह भरांत अनेक नवे कवी जुन्या वृत्तरचनेंबाबत अनभिज्ञ राहिले आहेत.

आणि तशा रचनेलाही तिचे म्हणून एक सौंदर्य असते या गोष्टीचा त्यांना विसर पडला आहे. यामुळे एकूण मराठी कविता आपले कांही चांगले गुण-विशेष पूर्णत: गमावून बसेल की काय अशी भीती वाटू लागली आहे. या पार्श्वभूमीवर पारखी यांची वृत्तबद्ध रचना मन विशेष ओढून घेते. शार्दूल-विक्रीडित, मंदाक्रांता, शिखरिणी, मालिनी, सुमंदारमाला अशी अवघड अक्षरगणवृत्ते पारखी फार सफाईने हाताळतात. त्यांच्या या रचना कौशल्याचे कांही नमुने मला मुद्दाम द्यावेसे वाटतात –

योगायोग पहा विचित्र, कुठला मी कोण, तूं कोठली ?
आकाशी शतजन्मगीत रचुनी गातात तारांगणे,
काळाचा महिमा अतर्क्य, विणतो धागे कुणाचे कुठे,
तागे देउनियां शिरावर पुन्हा पृथ्वीवरीं धाडतो.

हे शार्दूलविक्रीडित. आता ‘ शिखरिणी ’ तली रचना पाहा–

व्यथा आषाढाच्या धरणि हृदयांतून दडवी
जरा माझे अश्रू पुसुनि मज पंखांत लपवी
सुगंधाचीं स्वप्नें बघत सुकल्या मुग्ध कलिका
पुन्हा ताई पाठीवरति फिरवी हात हलका.

हीच प्रसन्न रचना मालिनी वृत्तांतही आहे –

शिरिष मृदुलता तूं अमृताचे निधान,
परिमल विमले तूं स्नेहमूर्ती महान,
फिरव कर जरासा पाठ माझी लहान,
बरस मधुर माया, लागली गे तहान.

पण अशा सफाईने वृत्तरचना करणारे पारखी जेंव्हा क्वचित ऱ्हस्व-दीर्घाची ओढाताण करतात, एखादी मात्रा वाढवतात किंवा रचनेच्या सोयी-साठी ‘ भगीनी ’ ‘ क्षिरसागर ’ असे अशुद्ध लेखन करतात तेव्हा रसभंग झाल्याखेरीज राहात नाही. इतरही कांही गोष्टी मला खटकल्या. ‘ अमिट ’

सारखा हिंदी शब्द – कारण नसतां – त्यांच्या कवितेत येतो. कधी मात्रांचा हिशेब सांभाळण्यासाठी ' कर फिरवशील ' ऐवजी ' कर फिरशील ' अशी रचना ते करून जातात. कधी ' वात्सल्यता,' ' सौजन्यता ' असे चुकीचे शब्द ते बनवतात. येरव्ही शुद्ध, सुबोध व सफाईदार शैली असलेल्या या कवीने असे दोष टाळणे फार आवश्यक आहे.

' रक्षाबंधन ' काव्यांत अशा कांही गोष्टी खटकल्या तरी त्यांत आवडण्याजोगे, मनाला वेधून घेण्याजोगेही खूप कांही आहे. पारखी हे चांगल्या अर्थाने – शब्द वेल्हाळ कवी आहेत. शुद्ध संस्कृत शब्दही ते निर्दोष-पणे व सहजतेने आपल्या कवितेत योजितात. कल्पकता आणि भावनोत्कटता हे पारखींच्या काव्याचे हृदयंगम विशेष आहेत. त्यांच्या कल्पकतेचे कांही सुंदर नमुने इथे दिल्याखेरीज राहावत नाही. ही कल्पकता प्रतिमायोजनेतून व्यक्त होते हे विशेष –

– तुझा तळहात
जसा गार दहीभात
लावूं गिळताना दांत
– कशापायी ?

– तुझा रुसूं राग
मऊ रेशमाचा नाग
विष चढे परी आग
– होईचना ।

– ना कुणी जाती पुसाया अंबराची आसवें
चंद्र, तारे हांसती पण बोलती ना त्यासवें !

पारखी यांच्या प्रतिमा आशयघन तशाच नाविन्यपूर्ण आहेत, ' भाळावर रुसलेला हिरवा बिंदू,' ' सात नभांचे ऋण,' ' आकाशाचा ओला

पंख ' ' स्वरांच्या पक्ष्यांनी चोचींत भरलेली मुकी गीते ' ' इंद्रधनुष्याची राखी ' यांसारख्या त्यांच्या प्रतिमा मनांत अर्थाची विस्तारणारी वलये उठवतात. वृत्तबद्ध, संस्कृतप्रचुर, प्रगल्भ रचना करणारे पारखी कधी कधी अत्यंत साध्या, अर्थपूर्ण शैलीतही तितक्याच चांगल्या कविता लिहितात. ' पालीला गेलो तेंव्हा ' ही या प्रकारची त्यांची एक उत्तम कविता एखाद्या चित्रकाराने चित्र रेखाटावे तशी या कवितेतली वर्णने आहेत.

डोंगराच्या सुळक्यांत
लपलेली दाट झाडे,
वळणाची वाट जाते
बहिणीच्या गावांकडे

कपारीच्या पायथ्याला
गाव उभा बिलगून,
मंदिरात बसलेला
विघ्नहर्ता गजानन

शिशिराचें ऊन्ह सांगे
गोपुराच्या कळसाला,
' पाहा एका बहिणीला
भेटायला भाऊ आला ।'

अशा साध्या चित्रमय रचनेतून ही कविता साकार होते आणि मनावर विलक्षण परिणाम करून जाते. पारखी यांच्या इतर संस्कृतप्रचुर कवितांपेक्षा त्यांच्या अशा साध्यासुध्या कविता अधिक उत्कट, भावपूर्ण वाटतात.

' रक्षाबंधन ' वाचतांना ज्या प्रतिक्रिया होत गेल्या त्या तशाच मी

इथें नोंदल्या आहेत. एकूण हे काव्य मला आवडले. प्रियकर प्रेयसींच्या प्रेम-कहाण्या आपण नेहमी वाचतो. बंधुभगिनींच्या प्रेमाचे हे स्तोत्र तितकेच चित्तवेधक आहे. वाचकांनाही तें तसें वाटेल यांत मला शंका नाही.

– शांता ज. शेळके

गुढीपाडवा
चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १९०६
दिनांक २ एप्रिल १९८४

# अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | रक्षाबंधन | १ |
| २ | नयनांत संथ हेमंत | २ |
| ३ | ऋण | ३ |
| ४ | फुले तुळशीचा मळा | ५ |
| ५ | मूक झाला किनारा | ७ |
| ६ | पाज्ञीला गेलो तेंव्हा | ८ |
| ७ | तूं तोडिले तरीही | १२ |
| ८ | मला वेड ताई तुझ्या दिव्यतेचे | १४ |
| ९ | मी काल बिजेंच्या चंद्रकोरिला म्हटले | १७ |
| १० | थोरली होशील ना? | १९ |
| ११ | केंव्हा येंशिल ? | २० |
| १२ | उद्यां येते | २१ |
| १३ | स्वागत गीत | २२ |
| १४ | स्वप्नभेट | २४ |
| १५ | जा सुरांनो अंगणीं | २७ |
| १६ | दीपांनो ! | २८ |
| १७ | आराधना | २९ |
| १८ | एक मात्र म्हणशील | ३० |
| १९ | सत्यता चिरकाल आहे | ३२ |
| २० | ऋणभार | ३३ |
| २१ | कुणि मुक्त कलंदर होता | ३५ |

| | | |
|---|---|---|
| २२ | परकाच मी शेवटी | ३६ |
| २३ | तूं जिंकिले अखेरी | ४३ |
| २४ | तुझे पाय माझ्या घरी येतिल | ४५ |
| २५ | तुझा आभास राहीला | ४६ |
| २६ | बहु दिवसांनी | ४७ |
| २७ | किनाऱ्याला लाटा | ५० |
| २८ | जागे शैशव जाहले | ५१ |
| २९ | आज कितीक वर्षानं | ५३ |
| ३० | मानाचा मंदील | ५५ |
| ३१ | चिमुकले पंख तूं माझे | ५६ |
| ३२ | एकमेव थेंब होऊ | ५८ |
| ३३ | केवळ गंधमात्र उरलो | ५९ |


卐

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९४
दा. क्र. २७३६२
काव्य १५१९०१३
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## रक्षाबंधन

तूं नाही जवळी तरी कुणितरी आहे तुझ्यासारखी,
ताई, तूंच जणू सदा विहरते डोळ्यांपुढे नेहमी ;
आषाढासम सांवळे स्वरुप हे स्नेहार्द्र ओथंबले ,
भांगातून उषा गुलाल उधळे, भाळावरी गोंदले ;
गंगा मंगल ही उदात्त चरिता, शालीनता, माधुरी ;
वाणी पुष्पमृदूल आणि शुचिता, गंभीरता अंतरीं.
वाटे रोज हिच्या सुहास्यवदनें वर्षोत मुक्तामणी,
भगिनीप्रेम मला इथेंच मिळते, घेतो सदा वेचुनी.
सांगावी तिजला कशी नचकळे माझी मनोकामना,
" रक्षाबंधन आज येउन करीं राखी मला बांध ना."
आला श्रावण गर्जती दशदिशा, वारे नभीं धुंदले,
धारानृत्य धरेवरी, कडकडा विद्युल्लता कोसळे ;
मेघांचा लयताल, मत्तमयुरां झंकारवा पैंजण,
रक्षाबंधन आज एक भगिनी बांधी मला बंधन.
ऐसे बंधन जे सदैव हृदयां बांधोनिया ठेविल ;
उल्कापात घडो, तुफान उसळो, भंगोनि ना जाइल.
क्षितिजाचे गगना करीं धरतिने जे बांधिले बंधन,
तैसे सुंदर आणि सत्य, शिव हे राहो अम्हां भूषण.

**वसंत ऑगस्ट १९८२**

卐

## नयनांत संथ हेमंत

भांगांत केशरी पूर्वा
माथ्यावर वर्तुळ कुंकू,
किंचीत जरासा खाली
रुसलेला हिरवा बिंदू.

नयनांत संथ हेमंत
निर्व्याज, लीन, कुलवंत;
उमटून पुन्हा मिटलेले
मृदु हास्य निरागस मंद.

हातांत हात जुळलेले,
सौभाग्यसूत्र रुळलेले,
त्या अथांग हृदयांमधले
रस, रंग मला कळलेले.

घनःश्याम सांवळा मेघ
आभाळ सोडुनी आला,
निष्पर्ण पिंपळामधुनी
हुंकार पुन्हा उठलेला.

卐

## ऋण

काय हवें तें मागुनि घे मज,
शतजन्माच्या आयुष्याचे
तुजला आंदण,
युगायुगांतावरी शिरावर
सात नभांचे
मान्य तुझे ऋण.

मानेवरची अवजड शीला
हळूंच उचलुन,
प्रतिभेच्या पंखांतिल माती
सशक्त उच्छ्वासाने फुंकुन;
बोट उंचवुन पुन्हा दाविलेस–

–दूर डोंगरांच्या शिखरावर टेकलेले इंद्रधनुष्य.
म्हटलेस, 'जा, घे झेप अन् गात रहा –'
आज भासते थिटेच सारे
आकाशाचे दहा कोपरे.

क्षितिजाच्या फांदीवरच आतां पंख विसांवतील.
तोंवर ठेविन इवल्याशा पंखांतुन कवळुन,
- उत्तर दक्षिण, पूर्व, पश्चिमा.
फडफड हलवित पुन्हा भरारी,
एका झेपेमधून दुसरी.

मात्र असूं दे घट्ट बांधला
तव नजरेचा रेशिमतंतू.
भरारतांना स्वप्नपहांटे
खरेंच घेइन अलगद उचलुन
पंखावरती–मंद निळया शुक्राच्या सोबत
आणि–
भिजवुन आणिन
इंद्रधनूच्या
सातहि रंगांमधुनी.

卐

# फुले तुळशीचा मळा

तुझं माझं नातं,
जसा देव देऊळांत
आणि मंद फुलवात
– पायापाशी.

तुझे दोन डोळे,
त्यांत इंद्रायणी खेळे,
मला एकटचाला कळे
– गहिराई.

तुझा तळहात,
जसा गार दहीभात,
लावूं गिळतांना दांत
– कशापायी ?

तुझी शब्दकळा,
फुले तुळशीचा मळा,
मना लागलासे ळळा
– मंजिरीचा.

तुझा रुसूं राग,
मऊ रेशमाचा नाग,
विष चढे परी आग
– होईचिना.

तुझे माझे गीत,
जगावेगळीच रीत,
जशी द्रौपदीची प्रीत
– यादवाशी.

तुझा लोभ माया,
दाट आवळीची छाया,
तुला पांडुरंग राया
– सुखी ठेवो.

卐

## मूक झाला किनारा

"परत कधि तुझ्या मी येउ ताई घराला. ?"
पदर करि धरोनी भाउ जेंव्हा म्हणाला,
थबकुनि क्षण मागे पाहती नेत्र ओले,
गगन भरुनि आले, मेघ निःशब्द झाले.

किति किति दिवसांनी लाभला गे जिव्हाळा,
तुजविण बघ होता पेटलेला उन्हाळा;
क्षणभर मज ताई येउ दे सावलीशी,
गहिंवर बघ माझ्या दाटतो की गळ्याशी.

शिरिष मृदुलता तूं, अमृताचे निधान,
परिमल विमले तूं, स्नेहमूर्ती महान;
फिरवि कर जरासा पाठ माझी लहान,
बरस मधुर माया लागली गे तहान.

घरकुल इवलेसे दूर कोठे दिसेना,
अवघड किति धावूं ? वाट कांही सुचेना;
तिळतिळ तुटतांना कोण देई निवारा ?
कणकण झिजतांना मूक झाला किनारा.

वसंत, जाने. १९७१

卐

**पालीला गेलो तेंव्हा–**

डोंगराच्या सुळक्यांत
लपलेली दाट झाडें,
वळणाची वाट जाते
बहिणीच्या गावांकडे.

कपारीच्या पायथ्याला
गांव उभा बिलगून,
मंदीरात बसलेला
विघ्नेश्वर गजानन.

शिशिराचे ऊन्ह सांगे
गोपूराच्या कळसाला,
'पहा एका बहिणीला
भेटायला भाऊ आला–'

देवळाच्या उजवीला
तलावाच्या कांठांवर,
नारळाच्या झावळांत
बहिणीचे कौलार.

अंगणांत भरदार
तुळसीचे वृन्दावन,
रंगावली रेखलेली
शेण, माती सारवून.

भिरभीर न्याहाळत
दारामधे उभा राही,
तेंव्हा ताई म्हणाली की,
‘ इथें तुझे कुणी नाही ’

मागल्याच पायी गेला
तुळसीच्या ओटचावर,
दोन गाई हंबरुन
आल्या मुळा–मुठेवर.

सांगायला आलो होतो
सारा मान–अपमान,
काय माझा अपराध?
गेलीस तूं रागावून

फणसाचे झाड उभे
पोफळीच्या झाडापाशी,
ताई, मला घे ना जरा
तुझ्या गार सावलीशी.

येऊं दे ना हात ओला
पोळलेल्या पाठीवर,
घेई मला पदराच्या
पंखाखाली ऊबदार.

दुनियेचा व्यवहार,
मोठी खडतर वाट,
ताई, मला चढायाचा
उंच पर्वताचा घाट.

थकलेल्या पावलांना
ओढ तुझ्या घरट्याची,
तहानल्या गळ्यामध्ये
प्यास तुझ्या ओलाव्याची.

अंतरीचे उकलाया
जिव्हाळ्याची जागा हवी,
तिथे नको मान-पान
आभाळाची माया हवी.

असू दे ना थोडी माया
भावासाठी कोपऱ्यांत,
याच्याविण दुजे नाही
मागायाचे आयुष्यांत.

काळजांत कालवून
कशी होते उलघाल,
एकदांच माझे दोष
ताई, पोटामधे घाल.

तुळसी तूं सांगशील
माझे मन बहीणीला,
येईल ती तुझ्यापाशी
सांजवाती लावायला.

मांगल्याने नटलेली
आहे तीही तुझ्यासम,
वात्सल्याने ओथंबली,
वसुंधरा घनःश्याम.

आठवून पापण्यांत
पाणकळा कोसळतो,
जडावल्या पावलांनी
आतां परतूनी जातो.

देवळांत आरतीचा
घण घण घंटानाद,
देवा, माझ्या बहिणीला
देई शुभ आशीर्वाद.

दोन्ही कर जोडूनियां
विनवितो बल्लाळाला,
" देवा, कधी धाडशील
माझ्या घरीं बहीणीला ?"

卐

## तूं तोडिले तरीही....

अपुले पवित्र नाते मी मोडणार नाही,
तूं तोडिले तरीही मी तोडणार नाही.

घर दूर राहिलेले अन दूर तो जिव्हाळा,
स्मरतां कसा गळ्याशी हेलावतो उमाळा,
साऱ्या व्यथा कथाया होती मलाच घाई.
तूं तोडिले तरीही ...

मंदीर एक जेथे घनःश्याम शांत मूर्ती,
जी स्वागतास माझ्या भगिनीसमान होती;
तरळून चित्र येतां पुसतात आसवें ही.
तूं तोडिले तरीही...

सहवास चंदनाचा क्षणकाल लाभलेला,
स्मृतिगंध अंतराला व्यापून राहिलेला,
इतुकेच पुण्य होते, दुर्दैव आड येई.
तूं तोडिले तरीही ...

द्वितियेत चंद्र होता, वसुधा समोर भोळी,
तबकांत रत्नज्योती उजळून थांबलेली;
तें स्वप्न लोचनांच्या गेले बुडून डोहीं.
तूं तोडिले तरीही...

'वेड्या मनांत माझ्या प्रतिमा पवित्र राहो,
मांगल्य भावनांचे देवा अलोट वाहो,
माझ्याहि वांटणीचे तिज सर्व सौख्य देई–'
तूं तोडिले तरीही …

अपराध काय माझा ? शंका असेल कांही,
जरि बोचले मनासी, विसरुन सर्व जाई,
नि:शंक ये घरासी, म्हण एकदांच ' भाई.'
तूं तोडिले तरीही …

卐

## मला वेड ताई तुझ्या दिव्यतेचे

अम्हां अज्ञ प्राण्यांस कैशा कळाव्या.
जुन्या जन्म जन्मांतरीच्या खुणां ?

परी योग येतो असा जीवनीं की,
उफाळून येती अशा भावना.

प्रवाहांत लाटा उठोनी, फुटोनी
पुनर्जन्म घेतात त्या सारखा,

तुला पाहतांना तसा भास होतो
असा कां जिव्हाळा ? अशी ओढ कां ?

सतीचे तुझे शील चारित्र्य संपन्न,
पावित्र्य शरदांतली पौर्णिमा;

तुझे भाव सौंदर्य, सौहार्द, माया,
नभाचा जणू ओतला नीलिमा.

तुझ्या रोमरोमांत स्नेहार्द्रतेचा
असे दाटला सांवळा श्रावण;

तुझा शब्द प्राजक्त पुष्पापरी गे
असे आसमंतास भारावुन.

स्वभावांत शालीनतेच्या सुगंधी
फुलांनी जणू वांकली मोगरी;

तुझ्या व्यक्तिमत्वास सौजन्यतेचा
किनारा असे रेशमी भर्जरी.

उन्हाच्या झळा झोंबलेल्या जिवाला
दिलासा अशी सावली पाहुनी;

अशा गार छायेत फुंकून घ्याव्या
कळा अंतरीच्या जरा थांबुनी.

असे एक नाते असावे जिथे की,
वृथा संशयाची नसावी भुते;

सुगंधास हेवा सुटे, मोरपंखी,
जरा स्वाद स्वर्गी सुधा मागते.

क्षणीं त्याच संकोच सोडून सारा
भगीनी तुला मी मनीं मानिले;

मुक्या वेदनांच्या उकलीत गांठीं,
तूं शिंपिले आणि मी प्राशिले.

— अंकल्पीत झाले, दुभंगून गेले
बिलोरी महालांतले आरसे;

चुराडा पडे, काच बोचून पायीं
तुटे पंख, सारी गळाली पिसे

नको स्वप्न मोडूं, अशी वेल तोडूं,
कसे प्रेम माझे तुवां भंगले ?

नको दुष्ट शंका मनांतून आणूं,
मला तूंच, ताई महन्मंगले.

फुलें टाकुनी कां धुळीलाच वारा
नभीं उंच नेतो ? उलटी रिती;

समुद्रांत मोती विसरून लाटा
किनाऱ्यावरी काटक्या आणिती.

मुलामाच आहे जगीं मान्यतेला,
असत्यास गाती स्तुती–आरती;

कुणां ना कळे, व्यर्थ आक्रांत माझा,
खुळा गाळितो अश्रुधारा किती.

कधी ना कधी सूर्य उगवेल माझा,
अहोरात्र अंधार ना राहिल;

मला फक्त 'भाई' म्हणायास ताई
कधी ना कधी तूं घरीं येशिल.

मला वेड ताई तुझ्या दिव्यतेचे,
तुझे शिल्प कोरीन माझ्या उरीं ;

परी कंठ दाटून येतो उमाळा,
मुकी आसवें ऊष्ण गालांवरी.

卐

## मी काल बिजेच्या चंद्रकोरिला म्हटले

मी काल बिजेच्या चंद्रकोरिला म्हटले,
'ये, पूस एकदां माझे भरले डोळे,
अन दोन आसवें त्यांतिल नेउन देई,
ती रुसून बसली माझी प्रेमळ ताई.

शालीन लता ती नटली गुणगंधाने,
वा तुळसी वृंदावनांत पावित्र्याने;
सौजन्यरसाचे शिल्प सांवळे एक,
जे उजळुन गेले माझे प्रतिभालेख.

कंठांत निनादत येतो स्वरगंधार,
ओठांत कडेला चंद्रस्मित हळुवार,
नयनांत वर्षते शांतरसाची धार,
लालित्य लिलांतुन फुलते वारंवार.

अन सांग तिला की, वाट पाहतो भाई,
अर्ध्याच वेदना ऐकिल्यास तूं ताई;
संकोच, अहंता सोडुन सांगायासी
मी वेडा धांवत होतो तुझियापाशी.

वेडांत विसरलो जनरीतीचे भान,
वय, वेळ, काळ अन पुरुषाचा अभिमान;
अक्षय्य लाभले वाटे प्रेमनिधान,
कां सांग अचानक गेलिस रागावून ?

वाटे तव ओला आकाशाचा पंख–
झांकून, फुंकुनी देशिल सलते डंख;
क्षणकाल वर्षल्या अमृत–आषाढाने
भिजलेस कोरडे जीवन केविलवाणे.

मज शपथ लाभले होते भगिनीप्रेम,
मधुमंगल, चंदनशीतल, जे अभिराम;
आजन्म खरोखर अशीच रुसुनी राही,
मी पुन्हा पुन्हा तुज आळवीन गे ताई.

मी काल बिजेच्या चंद्रकोरिला म्हटले,
'ये, पूस एकदां माझे भरले डोळे–'

**वसंत डिसेंबर ७१**

卐

## थोरली होशील ना ?

जन्म जावो कोरडा अन ना कुणां कळले तरी
थोरली भगिनी तुला मी बांधुनी ठेवीन ना.
मी कितीदां बोललो अन ऐकिले होतेस तूं,
पाहुनी डोळयांत माझ्या 'होय' तूं म्हटलेस ना ?
ना जगाची मान्यता, तूं संशयाने वेढली,
मी असा परका, खरोखर तूं पुन्हा भ्यालीस ना ?
कूस एका आईची आम्हांस नाही लाभली,
एवढयाशा कारणाने रान हे जळतेच ना ?
ईश्वराला मागतो मी जन्म पुन्हा श्यामले,
धाकला भाऊ तुझा, तूं थोरली होशील ना ?

卐

## केंव्हा येशिल ?

येतां सूर्य थकून पश्चिमतटीं लाटांवरी थांबतो,
संध्येचा कर केशरी करपल्या पाठीस गोंजारतो ;
वर्षामागून वर्ष चक्रगतिने जातील हे जातिल,
केंव्हा तूं मज भेटण्या परतुनी येशील गे येशिल?
वेडा पीर, खुळा खुशाल म्हणुं दे, मी ऐकतो ना कुणां,
भगिनी मी तुज मानिले सुचरिते, हा काय झाला गुन्हा ?
पहिल्यांदा अपुल्या मधाळ वचनें कां लाविलासे लळा?
केंव्हा येशिल पाहण्यास रसिके तूं शिपिलेला मळा ?
साध्वी, सोज्वळ, चारु, मंगल, ऋजू, निर्व्याज, श्यामायणी ;
स्वर्गांतून अशी बहीण मिळते का मोहरा देउनी ?
देवा ! दे तुझिया समान भगिनी, प्रार्थीन मी मंदिरी ;
केंव्हा येशिल एकदा फिरविण्या वात्सल्य पाठीवरी ?
द्वितियेची जशि चंद्रकोर भिजते सांजावलेल्या नभीं,
ताई, मी पुसले कितीतरि पुन्हा डोळ्यांमधे तूं उभी ;
कवितांची अशि भाऊबीज जगती कोणांस ना लाभली,
केंव्हा येशिल सांग ना मम गृहीं द्यायास ओवाळुनी ?
कालौघांत उद्यां बुडून अपुल्या जातील नौका जरी,
माझे भावतरंग वेढुनि तुला असतील व्योमांतरी ;
'ताई' होऊनि वाट पाहशिल का पुढिल्याच जन्मांतुनी ?
तेंव्हा येइन श्यामले पुनरपी मी धाकला होउनी.

卐

## उद्यां येते...

तुझे माझे नाते, मधुरतर अमृत भिजले,
सुवर्णाच्या वृंदावनिं तुळसिचे रोप रुजले;
सुगंधाने वेडे मलयगिरीचे श्वास रुसले,
विधात्याने भाळीं कधितरि महापुण्य लिहिले.
गुन्हा होता कांही म्हणुनि जननी एक चुकली,
किती शिक्षा मोठी ? तरिच उशिरा गांठ पडली;
सुधाराया सारे वणवण किती रान फिरतो ?
दऱ्या, खोरी, कांटे तुडवित तुला ना विसरतो.
किती आले गेले, तुजसम कुणी नाहि दिसले,
भगीनी प्रेमाचे सहजहृदयीं पंख फुटले;
नको तोडूं ताई, अतुट अपुले बंध जुळले,
सुसंवादी तारा अविरत अशा ठेव असले.
स्वरांच्या पक्ष्यांनो, हळुंच उतरा फेर धरुनी,
मुकी गीते चोची भरुनी मिरवा दूर गगनीं;
ढगांना जा सांगा, "अरूणसमयीं रंग उधळा–"
"उद्यां येते" ऐसे मजसि वदली, पर्णकुटिला.

卐

## स्वागत-गीत

ये उद्यां खरोखर घरासि माझ्या ताई,
निशिगंध शिंपुनी ठेविन ठाई ठाई,
दारास बांधुनी तोरण हिरवेगार,
उजळीन अंगणीं ज्योती एक हजार,

वाटेवर माझी जिथें आसवें गळली,
तूं बघशिल तेथे रुसल्या बोगनवेली,
निःश्वास कांपरे स्पर्शतील तुज जेंव्हा,
होतील कळ्यांचे कंठ मोकळे तेंव्हा.

अळवीत बैसलो ज्या ज्या खडकांवरती,
तें वेडे अजुनी तुझीच गाणीं गाती,
त्यांचेच उसासे वाऱ्यावर दिनरात,
फिरवीत ये जरा पाठीवरती हात.

ये महन्मंगले उभवुन मुक्त पिसारा,
ये, उधळत उन्नत, उदात्त जीवनधारा,
ये, पदरा बांधुन वत्सल पश्चिम वारा,
झंकारत येई दिशादिशांच्या तारा.

ही तुझीच माया गीत होउनी झरते,
तव  भावमुग्धता शब्दलतेवर फुलते,
पावित्र्यगंध हा तुझिया हृदयांमधला,
मकरंद ओतुनी छंद लयीतुन उरला.

आषाढ संपुनी उलगडले आभाळ,
बहिणीचे नाते तूंच अतां सांभाळ,
माहेर तुझे हे, नको बघू विपरीत,
ये, ओठीं फुलले उत्कट स्वागत-गीत.

卐

## स्वप्नभेट

आलीस ना जरी तूं,
नाहीच बाब मोठी,
ताई, तुझ्या नि माझ्या
होतात स्वप्न भेटी.

तूं आजच्या पहांटे
आलीस अंगणांत,
ओढून हात माझा
नेलेस गे नभांत.

तेथे प्रकाशगंगा
दुथडी वहात होती,
क्षितिजावरी सुरंगा
रजनी नहात होती.

क्षण तोंच थांबलीस
माझ्याकडे वळून,
मउशार हात दोन्ही
माझ्या करीं जुळून.

म्हटलेस, " शारदेच्या
कंठात घालण्याला
ये, वेच तारकांची
देते करूनि माला–"

वेचून आणिले मी
उत्फुल्ल तारकांना,
आनंदलीस तूंही
सुमहार गुंफतांना.

आकाश भारलेले
मांगल्य पांघरून,
वेडा सुगंध होता
तेथेच दर्वळून.

म्हटले किती तयाला,
" जा, ओत रे कळ्यांच्या–
चोचींत गंध, उठल्या
झोपेतुनी कधीच्या–"

म्हणतो कसा खुळा तो,
" मज द्याल का जरासा
तुमच्या विशुद्ध हृदयां–
तिल गंध एवढासा.

निरपेक्ष प्रेम ऐसे,
सौंदर्य भावनांचे,
हा अर्क अमृताचा,
हे स्वप्न कांचनाचे.

हा वारसा शिवाचा,
हे सत्व सात्विकांचे,
हा कोष मंगलांचा,
चिद्‌ब्रह्म आत्मिकांचे.

हे मैत्र्य सुहृदांचे,
असले विशुद्ध नाते,
दुनियेत बेगडांच्या
मी पाहिले न कोठे–"

म्हटले पुन्हा तयाला,
" तूं बोलतोस गूढ,
भाषा तुझी कळेना
आम्हांस अज्ञ, मूढ.

लावूं नकोस दृष्ट
राही खुशाल येथे,
प्राणाहुनी अमोल
अमुचे पवित्र नाते.

एका कुशीत आम्हां
ना जन्म लाभलेला,
ही चूक ईश्वराची
ना बाधते अम्हाला.

हे पूर्वपुण्य थोर
आले असे फळास,
झाले अमूर्त मूर्त
साकार दर्शनास."

" क्षण एक बैस ताई
मिटवून लोचनांना,
माझे गुपीत वाटे
संकोच सांगताना.

एका निळया ढगाला
रेलून बैसलीस,
अन पाऊलें रूपेरी
गंगेचिया जळांत.

माझा अबोल हेतू
तुजला मुळी कळेना,
गालांत हांसलीस
मिटवून लोचनांना.

केसांत चांदण्यांचा
गजरा हळू तुझ्या गे,
मी माळतांच ताई
तूं पाहिलेस मागे.

घनश्याम शांत दरिया
नयनांत थांबलेला,
हलकेच लाट आली
जांभूळ ओठ भिजला.

" भाई, तुझा किती रे
माझ्यावरी जिव्हाळा ?
कंठांत गद्‌गदूनी
येतो पहा उमाळा.

तूं वागतोस ऐसा
जवळीक दावतोस,
विपरीत अर्थ भासे
ह्या बेगडी जगास.

तूं भेटलास माझे
शतजन्म पुण्य होते,
तूं बोलतोस तैसे
मज सांगतां न येते–"

इतुकेच बोललीस,
क्षण पापण्या पुसून,
शद्बांस कंप होता,
ओठांत थरथरून.

तूं फाडिले त्वरेने
पदरास भर्जरीच्या,
हातास बांधिले गे
राखी म्हणोनि माझ्या.

हलकेच हात माझ्या
पाठीवरी फिरून,
पदराचिया कडेने
डोळे दिले पुसून.

वदलीस, " राहुं दे रे
अपुले अभंग नाते,
जाते, उद्या पहांटे
तुज भेटण्यास येते–"

आले पुन्हा पुन्हा गे
डोळे तुझे भरून,
गेलीस चंद्रिकेच्या
पंखांवरी बसून....

दचकून जाग येतां,
मी पाहिले उठून,
अभ्रा उशातळीचा
होता पुरा भिजून.

रागिणी मे १९७०

卐

## जा सुरांनो अंगणीं...

कंठ माझा गात राहो, जा सुरांनो अंगणीं,
जेथ ताई सांजवाती लाविते वृंदावनीं.

जा तिला हळु साद घाला, शद्ब माझे घेउनी,
कांपरे निःश्वास ओले द्या जरासे स्पर्शुनी.

थांबली होतीस का तूं घेउनी पंचारती ?
आजुनी मी ठेविली ताई तुझी ओवाळणी.

कां असा धरिला अबोला, काय गे माझा गुन्हा ?
धाकला भाऊ तुझा मी, घे मला सांभाळुनी.

यापुढे का एकदांही भेटणें ना बोलणें ?
आसवांचा पूर येतो पापण्यांच्या आडुनी.

स्वप्न वेडे कोरलेले, श्यामले माझ्या उरीं
एकदां तूं ये घरीं अन् दे मला ओवाळुनी.

卐

## दीपांनो !

दीपांनो ! अपुली सुवर्ण किरणें पसरा तिच्या अंगणीं,
पाही चंद्र पुनःपुन्हा निरखुनी दारांमधे वांकुनी,
केला थाट असेल आज द्वितिया रंगावली रेखुनी,
ती माझी भगिनी असेल नयनीं नीरांजने लावुनी.
सांगा, " आज मधूर स्वप्न पडतां, ताई तुला पाहिले,
चौरंगीं बसवूनि स्नान मजसी प्रेमे तुवां घातले,
पदराने पुसलीस पाठ हलके, ओवाळितां श्यामले
भाऊबीज म्हणूनि अश्रु तुझिया ताटामधें ठेविले."
सांगा, " जांभुळओठ स्निग्ध हंसले, नव्हते मला ठाउके
भाई, अंतरसागरा ढवळुनीं तूं आणिली मौक्तिके,
प्रेमाला परिपूर्णताच नसते आकाशगंगेपरी,
जन्मोजन्म अशी तहान उरते कंठामधे बावरी "
सांगा, " स्वप्न खुळें खरें कधितरी होवो न होवो तरी,
माझ्या रेशिमभावना निशिदिनीं फिरतिल नीलांबरी.
त्यांचे दिव्य खगोलपुंज तुझिया दृष्टीपथीं येतिल,
चंदेरी किरणांवरी लहरूनी माझी व्यथा गातिल."
सांगा, एक निरोप, " आज भंवती आवर्त रोरावतो,
श्वासांना तुज, लंघुनी गिरिवरा, भेटावया सांगतो,
वज्राहून असे अनंतपटिनें सद्भावनांचे बळ,
राहो शीतल सावली तव शिरीं ही प्रार्थना केवळ."

卐

## आराधना

मान वा अपमान केला तूं कितीही यापुढे,
राग वा अनुराग दावी, काय त्याचे एवढे ?

मागल्या जन्मांतले तें शेष आतां साधतो,
राहिले उरकून घ्याया जन्म पुन्हा मागतो.

ना कधी कळतील कोणां सागरातळच्या कळा,
संचिताच्या वादळांना जन्म आहे मोकळा.

ना कुणी जाती पुसाया अंबराची आसवें,
चंद्र, तारे हांसती पण बोलती ना त्यासवे.

कोठुनी येती सुगंधी, कांचनी, मधु कल्पना ?
उद्‌गमाचा शोध घेतां ही तुझी गे प्रेरणा.

मी पुजा तव दिव्यतेची, मांडिली आराधना,
बोल वा ना बोल तूं पण राहुं दे ही वेदना.

लोकप्रभा गझल स्पर्धा
पारितोषिक, सप्टें. ७६

卐

## एक मात्र म्हणशील

म्हणायचे खूळ एक
एक वर्षभर होते,
शुद्ध भाव भावनांचे
फक्त एक स्वप्न होते.

व्यर्थ संशयाचे कुंड
तुझ्या मनीं पेटलेले,
तुला मला दोघांनाही
पुरेपूर भाजलेले.

नाही शपथ गळ्याची
पाप वासना शिवली,
तुला बहीण मानून
मनीं जपून ठेवली.

उगा नको ना तोडूंस
बंधू प्रेमाचे बंधन,
काय सर्पांच्या भीतीने
द्यावे फेकून चंदन ?

कशी दाखवावी तुला
माझ्या अंतरीची खूण ?
कसे पंख कापलेस
नभ निळे दाखवून ?

तूंही यावे माझ्यासवें
शारदेच्या मंदीरात,
याचसाठी होता सारा
अट्टाहास, आटाआट.

वाट चालतां चालतां
तुझा असावा आधार,
विसांव्याला सांवलीत
जरा उतरावा भार.

आतां पापण्या मिटून
सारे धागे उकलतो,
चाचपून निःश्वासांना
एकटाच गीत गातो.

कधी आषाढावांचून
येतो आकाशाला रड ?
दाणा भिजल्यावांचून
त्याला येत नाही मोड.

हिम वितळल्या वीण
नाही यमुनेला ओढ.
कधी जिव्हाळयावांचून
येतो भावनेला कढ ?

पानें कोवळी बत्तीस
गेला पाचोळा उडून,
पालवीचे लाल नवे
कोंभ गेले कोळपून.

पाणथळ आटलेली
मुळें आली मातीतून,
अखेरच्या इंधनाला
खोड द्यावे वाळवून.

कसे अपरुप झाले,
बरे आनंदाचे जिणे ?
स्मशानाच्या वाटेवरी
मढे माझे मीच नेणे.

एक मात्र म्हणशील.
माझी गाणीं गातां गातां,
" कुणी एक वेडा माझ्या
फक्त ओळखीचा होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९७
दा. क्र. २०.३.६२
काव्य ९५१.१०१
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## सत्यता चिरकाल आहे–

हे असे होणार आधी माहिती नव्हते मला,
तापल्या तारेवरी मी डौल माझा तोलला.

सोसतां अपमान सारा शब्द कां बोलूं उणा?
थोरल्या भगिनीपरी मी शोधिल्या साऱ्या खुणा.

तूंच गे सत्कारुनी हीं पेरिलेली भावना,
ओतुनी डोळ्यांत आतां शावकाची वंचना.

पाप की हे पुण्य माझे ? कांही ना कळते मना,
मींच माझा घाव केला ; दोष ना देतो कुणां.

सत्यता चिरकाल आहे सत्वशीले, चारुते,
कोरतीं आकाशितांना रोज ही निःश्वासिते.

卐

## ऋणभार

ऋणभार लिहिलेला
तुझा माझ्या माथ्यावर,
दऱ्याखोरीं ओलांडून
फेडायला आलो दूर.

जसा विधीलेख तसें
कथानक घडलेले.
किती किती शब्द शोधूं ?
आभाळही थिटे झाले.

तापलेल्या मातीतून
तुवां बीज पेरलेले,
किती उंच वेल गेला ?
तारकांची आली फुलें.

जसे रंग ओतलेस,
रेखल्यास जशा रेषा,
तसें चित्र उमटले,
तसें भाव आणि भाषा.

तेवढाच म्हणायाचा
तुझा माझा सहवास,
बहिणीच्या जिव्हाळ्याचा
घडलेला स्वप्नभास.

भास म्हणा, स्वप्न म्हणा,
आस म्हणा अंतरास,
खरा म्हणा, खोटा म्हणा,
परी एक वेडा ध्यास.

त्याच एका ध्यासापायीं
विसरलो मानपान;
मूकपणें सोसायाचे
खाली घालूनियां मान.

नाहीतरी दुनियेंत
कुणी कुणां ओळखीलें ?
भावनेला जपणारे
आधी वेडे ठरलेले.

दिव्य भाव दर्शनाचा
जपायचा साक्षात्कार,
भिजायचे अंतर्यामीं,
प्यावी अमृताची धार.

रिक्त माझ्या ओंजळीत
तुझे मौक्तिकांचे दान,
किर्र काळोखांत सुद्धां
आसवांना समाधान.

कधी जरी भेटलीस
ताई, तुला काय द्यावें ?
——अखेरच्या श्वासांचेही
तुझ्यासाठी गीत व्हावें.

卐

## कुणि मुक्त कलंदर होता

ओलांडुन डोंगर आला पांथस्थ प्यावया पाणी,
निर्झरिणी आटुन जातां ही घडली एक कहाणी;
कांठांवर खडकांवरती नित एक पाखरुं गाते,
" कुणि मुक्त कलंदर होता जोडून कुणांशी नाते--"

वैशाख सोसल्यावरती ह्या श्रावणधारा झरती,
अन गंध फुलवते माती, वर येती मख्मलपाती,
मग पश्चिम वाऱ्यासंगे कुजबुजते हिरवे पाते,
" कुणि मुक्त कलंदर होता जोडून कुणांशी नाते--"

कधि येते सागरभरती, कांठांवर लाटा फुटती,
अन दूर किनाऱ्यावरती निरखीत चालला धरती,
ताऱ्यांनी लुकलुकतांना रजनीला म्हटलें होतें,
" कुणि मुक्त कलंदर होता जोडून कुणांशी नाते--"

द्वितियेच्या चंद्रापुढती उजळीत निरांजन ज्योती,
क्षण ओघळलेले मोती लपवीत म्हणाली धरती,
" तूं असशील वेडा इतुका, हे मजला माहित नव्हतें, "
कुणि मुक्त कलंदर होता जोडून कुणांशी नाते.

वसंत जाने ७२

卐

## परकाच मी शेवटी

एका रम्य दिनीं प्रभातसमयीं आलो तुझ्या मंदिरा,
शब्दांनी हळुवार सस्मित मुखें केलेंस तूं स्वागत;
सारे मंगल स्नेहभाव बघुनी भगिनी तुला मानिले,
घरटे दूर असें म्हणून उसळे सद्भावना उत्कट.

तूं माझ्यासम शुभ्रशील विदुषी कवितेमधे रंगली,
होते उच्च विचार, वाङ्मय तसें वाचावया मागशी;
मर्यादा सुटली नसें तुजसवें मी बोलतांना कधी,
ऐसें सख्य समानशील व्यसने आदर्शवत् मानिती.

योगायोग पहा विचित्र, कुठला मी कोण, तूं कोठली ?
आकाशीं शतजन्मगीत रचुनी गातात तारांगणें;
काळाचा महिमा अतर्क्य, विणतो धागे कुणांचे कुठें,
तागे देऊनियां शिरावर पुन्हा पृथ्वीवरी धाडतो.

काव्यानंदवसंतमोहर फुले रसिके तुझ्यासंगती,
माझे मित्र किती, तुझ्यासम कुणी नाही कधी कष्टलें,
नेलें व्यासपिठावरी मज तुवां सन्मानिले आदरें,
द्याया दर्शन मूर्तिमंत प्रतिभा सामोर साकारली.

तेंव्हापासुन झप, सात गगनें पंखांत कवटाळुन,
तारा एक अजून दूर दिसतो, घेतो भरारी पुन्हा;
श्रद्धेचे बलवंत पंख असतां थांबावयाचे कसें ?
झालो नम्र, उगाच का विनवितो ? जपतो तुझ्या भावना,

नाही अंध मुळीं, उगाच भगिनी कोणांस ना मानिले,
नाही आजवरी कुणांस इतुके सख्यत्वही दाविले,
होतो हांसत सागरासम उरीं दडवून वडवानल,
येती रोज व्यथातरंग वरती तूं घालितां फुंकर.

रक्ताची असुनी बहीण इतुकी ना घातली पांखर,
कोठे कौतुक एवढें? कर कधी आला न पाठीवर,
" परके लेखुं नका– " असे कितिकदां मी बोललो, वागलो,
झाला हाच गुन्हा, तृषा उसळली संकोच सोडोनियां.

सांगाया जगतास धैर्य न तुला विश्वास होता जरी,
खोटा लावियला कलंक उलटा, आघात मर्मावरी;
वारंवार तुला किती विनविले सोडावया संशय,
अपमानास्पद शब्दबाण जहरी, उपहास नेत्रीं दिसे.

" आम्ही सभ्य, प्रतिष्ठितांत असतो, संसार आहे मला,
जननिंदा विपरीत, लोक हंसती, तुम्ही कसें वागतां?
नाकळती कविता अम्हांस तुमच्या खोटया, खुळ्या, वल्गना,
तुम्ही येउं नका पुन्हा मजकडे, दुसऱ्या कुठे दाखवा."

" झाले काय असें अचानक तुम्हां? कांही कुणी बोललें?
माझा काय प्रमाद? मी तर तुम्हां भगिनीपरी मानितो—"
" भगिनीप्रेम असो तुम्हांस तुमचे लखलाभ आम्हां नको,
जा, जा येउं नका पुन्हा मजपुढे; लोकांस सांगू कसें ?"

शिशिरावांचुन पान पान झडुनी उघडा उभा पिंपळ,
ग्रीष्मावीण कशी सपुष्प लतिका सुकली मुळांपासुन ?
दावूं घाव कुणां ? कुणी न दिसतें खांद्यावरी ज्याचिया—
ठेवोनी शिर आसवें झिरपुनी हा कंठ हो मोकळा;

दुर्दैवी दगडास फोडुनि जसें रस्त्यावरी टाकिले,
देवाने तसलें ललाट लिहुनी पृथ्वीवरी धाडिले;
स्वप्नांचे मधुशिल्प घेउनि उरीं विष्ठा, धुळीसोबत,
पथिकांचे पदभार पाठिवरती सोशीत आक्रंदतो.

ह्या खोटया जगतास मान्य बुरखे, दांभीकता, बेगड,
जिव्हा कांपुन सत्य कोंडुन पडे रानांत अंधारल्या;
वेडा, मूर्ख परी कृतघ्न अजुनी नाहीच गे जाहलो,
माझ्या रेशिमपाकळ्या तुडवुनी तूं काय संपादिले ?

कैसी वागतसे बहीण अपुल्या भावाचियां सोबत,
लटके राग रुसूं, विनोद, हंसणे नव्हतें मला माहित;
होती भास तसें, सुवर्णसलिले, येतां तुझ्या सन्मुख,
सांगू सर्व तुला कसें ? परिचिते, परका तुला जाहलो.

मैत्री ही कसली ? जिथें न उकले हृदयांतली वेदना,
कवयित्री कसली ? जिला न कळती शद्बांतल्या भावना,
"स्त्री" म्हणती सरिता खळाळत असे वेल्हाळ वात्सल्यता,
तूं आई असुनी तटावर उभा खडकांत मी कोरडा.

खाली घालुन मान, रोज पळणें बांधून ही पावलें,
डोळ्यांनीच दुरून गूज वदणें, भावर्तता कोंडणें,
फिरते शून्य शिरावरी गरगरां, शुन्याकडे धांवणें,
वाटा धुंडित शेवटी हरवणें, अश्रू मुकें ढाळणें.

सारे आठवुनी, समुद्र सगळा ढवळे तळांपासुनी,
आणी तें क्षणशिंपले उघडती वाळूंत शेवाळल्या,
स्वातीबिंदु तयांत पेरुन पुन्हा मिटवोनियां पाकळ्या,
देतो ओंजळ सोडुनी हळुहळू संध्यार्त लाटांवरी.

बघतो रोज तुझे निरागस हसूं पूर्वेस शुक्रावरी,
झुळझुळ निर्झरिणीतटी बसुनियां वचनें तुझी ऐकतो,
शोधायास तुझा सुगंध धरणी उष्णासवें शिंपितो,
पुसतो संथ प्रभातवात नयनें तुझिया करें तांबुस.

" धिक्कारून किती कठोर वचनें मी बोललें हो तुम्हां, ?
नव्हतें माहित की असेल तुमच्या हृदयीं अशी भावना–"
पश्चात्ताप मनीं, उधाण नयनीं, सात्वीकता पाहुन,
भारावून उभा नभासम तुझ्या क्षितिजापुढे वांकुन.

जाणवल्या असती जरी तुज व्यथा निष्पर्ण माडांचिया,
कां संकोच असा उगीच धरुनी बसलीस धास्तावुनी ?
थोडे तूं चुकलीस, मीहि चुकलो, विसरायचे वावगे,
वर्षाधार जशी तशीच धरणी भिजवीत येई घरां.

स्वप्नांची फुलपाखरें विहरती निस्पंद श्वासांवरी,
शद्बांचे कण कोंवळे निरखुनी ओठांतुनी आणिती,
कोठे ओंजळ घेउनी पलिकडे आहेस तूं ? ना कळे,
कल्लोळांतुन सांग येशिल कधी तूं चंद्रनौकेतुनी ?

केंव्हा येशिल ती पहांट दडली अंधारगर्भातुनी ?
होकारांत तुझ्या नकार असतो आतां पुरे जाणिले,
टाळाया क्षण कारणें हुडकशी खोटी किती वा खरी,
नाही स्वच्छ म्हणावयास कसली वाटे भिती ना कळे ?

ना आलीस तरी कुठें बिघडते आयुष्य माझे, तुझे ?
प्रत्यक्षांत नसेल भेट नशिबी स्वप्नांतुनी होतसे,
स्वप्नांचा प्रतिपाळ दंश करिती, माझे बरें चालले,
आतां निश्चित मी तुला नि मज तूं विसरोनि ना जाशिल,

चक्रावर्त असें किती परतले टकरावुनी मस्तकीं,
मोठी जिद्द उरांत, भेदुनि पुन्हा जाईन हें वादळ;
निष्ठाज्योत अखंड चंडकिरणें काळोख संहारिती,
वर्षेनंतर मार्गशीर्ष पसरे पिवळी उन्हें कोंवळी.

सत्यासत्य कधी कुणां न कळते, ठावें जगन्नायका,
जैसे रंग मनीं तशीच प्रतिमा डोळ्यांपुढे रेखिली;
नाही दोष कुठें ? तुझ्यांत असती, वगळून मी कोरतो–
भगिनीमूर्त जिवंत, मंदिर जिचे स्फटिकाहुनी सुंदर.

पापेच्छा लवलेशही न शिवली, साक्षीस वागीश्वरी,
आहे ओढ परी अनावर जसा तारा तुटे भूवरी;
मेघांच्या शिखरांवरी चढुनियां आकाशमाथ्यावरी,
मी, मी रोवियली तुझी फडकती किर्तीध्वजा केशरी.

कविता शिल्प तुझे अहर्निश असें राहो मला सोबती,
वर्षोवर्ष तुला बहीण म्हणुनी हा जन्म ओलांडिन;
देवाला तुज मागुनी पुनरपी माझ्या घरीं आणिन,
तेंव्हा अक्षत लावशील तुज मी ओवाळणी घालिन.

रक्षाबंधन, भाऊबीज असतां येशील तूं लोचनीं,
मोत्यांच्या मखरांत ठेविन तुझ्या प्रतिमेस शृंगारुनी;
जे जे मंगल ह्या असेल जगतीं ते ते तुला वाहिन,
आणी एक नवें सुनीत रचुनी ताई तुला गाइन.

आयुष्यांत कधीतरी दशदिशा गर्जोनियां चौघडे,
माझी मंगल आळवीत कवनें येतील दारीं तुझ्या,
माला घालुनियां, पुकार करुनी म्हणतील " तूं देवता "
तेंव्हा मात्र नसेन मीच जगतीं बघण्यां तुझा सोहळा.

तेंव्हा एकच अश्रुबिंदु लपुनी येवो तुझ्या लोचनीं
तो माझ्यास्तव, मीच तो समजुनी झांकून घे पापणी;
त्याला ढाळुं नकोस, तूं परतुनी लावी पुन्हा मागुती;
स्वानंदी बुडुनी मनोगत तुझे वाचीत तो राहिल.

लाभो औक्ष सहस्त्रजन्म, पसरो गुणगंध वाऱ्यावरी,
समृध्दी–सुखसंपदा--कुमुदिनी वर्षो तुझ्या अंगणीं;
यावश्चंद्रदिवाकरौ नभ निळे व्यापून सद्‌भावना–
ठेवो शीतल सावली तव शिरीं, देवास ही प्रार्थना.

लाटेमागुन लोटती पुनः पुन्हा लाटा किनाऱ्यावरी,
शब्दांमागुन शब्द धांवत तसे कंपीत ओठांवरी;
जातां लाट विरून कांठ उरतो ओलावला एकटा,
तूं येशील कधी ? कधी न; ठरलो परकाच मी शेवटी.

卐

## तूं जिंकिले अखेरी

तूं जिंकिले अखेरी, मी युध्द हारलेला,
ना मानिले तरीही समजाविले मनाला.

उरिं तीर हे रुतोनी विंधून टाकलेले,
घायाळ सैन्य सारे, ध्वज पार फाटलेले,
नतशीर, जायबंदी मी हात बांधलेला.
तूं जिंकिले अखेरी......

पायांत स्वप्नबेडचा, गळफांस भावनांचा
डोळ्यांवरी पहारा दिनरात आसवांचा,
तूं बांधिली सभोती उत्तुंग बंदिशाला.
तूं जिंकिले अखेरी......

साकार स्वप्न व्हावें, निर्धार घोर होता,
लिहिलें नसें ललाटीं, त्याचाच ध्यास मोठा,
साक्षीस श्वास ओले माझ्या पराभवाला.
तूं जिंकिले अखेरी......

तुटली मनें परंतू निरगांठ ही सुटेना,
चैत्रांत आम्र वठला नवपालवी फुटेना,
खोटे नवे दिखावे आतां हवें कशाला ?
तूं जिंकिले अखेरी......

उपमन्युसारखा मी तुझियापुढे भुकेला,
क्षिरसागरातटाकी फिरतो तहानलेला,
हृदयीं तुझ्या परंतू परकाच राहिलेला.
तूं जिंकिले अखेरी......

विषदंश अंतरीचे सांगू कसें कुणाला ?
झेपावतां जटायू अजि पंख छाटलेला;
दे तूंच गे तुझ्याशी सामर्थ्य झुंजण्याला.
तूं जिंकिले अखेरी......

卐

## तुझे पाय माझ्या घरीं येतिल

दुरावा असा तोडतो का मनाला ?
अबोल्यांतही बोलतो आपण;
अशी कोठली, केधवां दिव्य राखी
तुवां ठेविलीसें मला बांधुन ?

दिशांच्या पुढे लांब हृद्‌बंध माझे
तुला वेढुनी, ओढुनी घेतिल;
कडे आडवे, उंच लंघून ताई
तुझे पाय माझ्या घरीं येतिल.

बहाणे तुझे व्यर्थ, खोटे, पुराणे,
मनाचे तुझ्या कोपरे जाणतो;
कळाले तुला " आंत–बाहेर " माझे,
पुढे काय बोलूं ? मुका राहतो.

करीं एवढा अक्षरांचा पुरावा
तुझ्या भावकोषांतुनी ठेवतो;
विचारून घे, शब्द झाल्या व्यथेला,
निलाकाश, जेथे तुला पाहतो.

卐

# तुझा आभास राहीला

सांज सोनेरी सागरकांठाकांठानं चालली,
लाल पैठणी नेसून भाऊबिजेला निघाली.

एका जांभूळया ढगाचा मऊ शेला पाठीवर,
लाटालाटांत भिजतो जरा जरीचा पदर.

निळे ताम्हन हातांत दिवा लावीते एकेक,
बघा चंद्राला ओवाळी लुकलुकते दीपक.

आज येशील ना ताई लाल पैठणी नेसून ?
मला अशीच ओवाळ सांज सोनेरी होऊन.

अरे ! एकाएकी असा कसा अंधार दाटला ?
माझ्या सभोती केवळ तुझा आभास राहीला.

卐

## बहु दिवसांनी

बहु दिवसांनी भेटलीस गे ताई,
-- मधुबोल बोल ना कांही.

ह्या दुनियेच्या वादळलेल्या वाटा,
अंधार कोंदला मोठा.
आकाश पहा क्षितिजावर थकलेले
मुसमुसून झोपी गेले.
मज जायाचे उंच डोंगरावरती,
उजळीत यशाच्या ज्योती.

घरकूल राहिले दूर,
वाढतो नदीचा पूर,
अंतरीं उठे काहूर,
तूं मायेची छाया सोबत राही,
मधु बोल बोल ना कांही.
बहु दिवसांनी......

व्यवहाराच्या उंच मांडवाखाली
सोंगांची मैफिल जमली.
गणगोत इथे शोषाया टपलेले,
सापळे लावुनी बसले.

निरपेक्ष असें भाव कुठें मिळतात
कपड्यांच्या बाजारांत ?
मुखवटे घालुनी खोटे,
भरण्यास आपुली पोटे,
श्वापदें मिरविती येथें;
सत्प्रीतीची चाड कुणाला नाही,
मधुबोल बोल ना कांही.
बहु दिवसांनी……

ही रम्य निशा पांघरुनी गगनाला
किरणांचा रेशिमशेला;
मग शांतविते, कथिते एक कहाणी,
गुणगुणते अमृतगाणीं;
मी रोज तुला आठवुनी स्वप्नांत,
शोधतो मुक्या शब्दांत.
एकदां घरीं येशील,
पाठीवर कर फिरशील,
आसवें जरा पुसशील,
का बहिणीच्या हृदयीं नसते आई ?
मधु बोल बोल ना कांही.
बहु दिवसांनी……

भूमातेचे नाते ह्या चंद्राशी,
आपुलें तसें अविनाशी.

हृद्गंगेच्या कांठांवर रुसलेली,
कां उभी अशी हिरमुसली ?

अनमोल तुझे बोल नभीं घुमतील,
धारांतुन वन भिजतील.

अंकूर पुन्हा रुजतील,
वाऱ्यावर कुजबुजतील,
हलकेंच तुला म्हणतील,

" हे प्रेम खरें, ह्याची ना भरपाई–"
मधु बोल बोल ना कांही
बहु दिवसांनी भेटलीस गे ताई.

卐

## किनाऱ्याला लाटा

किनाऱ्याला लाटा कुशल पुसती फेनधवला,
शिरीं अंधाराच्या कर फिरविती वत्सल दिशा,
जसा आकाशाचा गहिंवर पुसे श्याम रजनी,
तुझा माझ्या पाठीवरति फिरतो हात भगिनी.

उरीं राही माझ्या शतकशतकें शुध्दचरिते,
असो ओठांवरती मधुरगुणसंगीत फुलतें,
तुझ्या पावित्र्याचा भरूनि असु दे गंध गगनीं,
भगीनी प्रेमाचे सतत असु दे बंध जुळुनी.

जुन्या पुण्याईचे कण उजळुनी दैव हंसलें,
जगाच्या बाजारीं कधि न मिळते प्रेम असलें,
नको ह्यांचे खोटे कपटधन, साम्राज्य इथलें,
हिरे, मोती ह्यांनी त्यजुनि शिरीं शंखास धरिलें.

व्यथा आषाढाच्या धरणि हृदयांतून दडवी,
जरा माझे अश्रू पुसुनि मज पंखांत लपवी;
सुगंधाची स्वप्नें बघत सुकल्या मुग्ध कलिका;
पुन्हा ताई पाठीवरति फिरवी हात हलका.

दीपलक्ष्मी मे ८३

卐

## जागे शैशव जाहले

ताई, आजवरी जिवंत मरणा माझ्याच मी भोगिले,
माझ्या थंड शवास मी उचलुनी सरणावरी ठेविले;
तेंव्हा शांतवनास मी मजपुढे बसलो सखा होउनी,
आलिंगूनि मला क्षणैक रडलो, आलो घरीं घेउनी.

तेंव्हापासुन मी असा भटकतो धुंदीत रानींवनीं,
ऐसा कल्पतरू जिथें क्षणभरी छायेमधे बैसुनी,
घ्याया फुंकुनि वेदना हृदयिच्या टेकूनि बुंध्यावरी;
ताई, तूं हिरव्या लतेसम उभी होतीस वाटेवरी.

आलों धांवत सांवलीत तुझिया सोडून माझे घर,
आहे उंच किती ? कळे न अजुनी, माझे यशोमंदिर;
राखेतून पहा सदेह उठलो आकाश चुंबावया,
गौरीशंकर गद्गदा हलवितो पृथ्वीस उलथावया.

खोटा मान नको, स्तुतीसुम नको, ऐश्वर्य कांही नको,
नाते तोडुं नको, सुशीलचरिते शंकीत होऊं नको;
माझा लौकिक, मानपान सरला, प्रौढत्व गेले लया,
जागे शैशव जाहले तुजपुढे हितगूज उकलावया.

तूं माझ्याजवळी बसूनि विमले थोडे तरी बोल ना,
दहिभातावर साय घालुनि मला जेवायला वाढ ना;
घाली फुंकर काळजावर जरा रक्ताळल्या, पोळल्या;
ताई, झांक मला हळूंच हिरव्या पानांतुनी कोंवळ्या.

## आज कितीक वर्षानं

आज कितीक वर्षानं
ताई भेटली, हांसली;
जशी मंदीरासमोर
दीपमाळ प्रकाशली.

आज उघडे सताड
तिच्या मनाचे मंदीर,
नंदादीपाचा उजेड
प डे देवाच्या समोर.

आली हांक अचानक
दीपकळी शहारली,
जरा मंदावली वात
पुढे सारुनियां दिली.

ताई उगाच बोलते,
खरें डोळ्यांत बोलणें,
जसे धूसर धुक्यांत
कोजागिरीचे चांदणे.

मन चिंब ओथंबले,
पुरे, नको ना बोलूंस;
तुझ्या शब्दांतून ताई
भुरभुरतो पाऊस.

गेला आषाढ-श्रावण
सारे मळभ संपले,
मार्गशीर्षातले ऊन्ह
ऊंसमळ्यांत सांडले.

ऊबदार ऊन्ह कसें
मऊ पिवळे पिवळे,
माझ्या पाठीस ताईचे
तळहातचि कोंवळे.

पोपटले भातशेत
वाऱ्यावर हेलावते,
भावनेच्या दोल्यावर
ज णूं ताई झोके घेते.

जाऊं दे ग उंच झोका
आभाळाच्या पैलतीरीं,
जिथे वीणा वाजवीत
बसलेली मोरावरीं;

शुभ्रवस्त्र आलंकृता
कोटीसूर्यसमज्योती,
विश्वगीता आळवीते
माय माझी सरस्वती.

रंग, रूप, वासहीन
जरा थोडे उमलले;
ताई, माझे गीत तुझ्या
पदराला बांधलेले.

अलगद गांठ सोड,
ठेव तिच्या पायांवर,
आणि सांग वारंवार
तिला माझा नमस्कार.

प्रणवाचे मोरपीस
आण माझ्या प्रतिभेला,
अनाहत स्वर–साज
आण माझ्या वैखरीला.

येतांना तूं थांब ताई,
हात लावी आकाशाला,
इंद्रधनुष्याची राखी
आण मला बांधायाला.

卐

## मानाचा मंदील

कोणते हो शुभग्रह
माझ्या कुंडलीत आले,
आज पहांटे पहांटे
तोंड कुणांचे पाहीलें ?

माझ्या कौलारू घरास
लाल आकाशकंदील,
कुणी बांधणार काय
मला मानाचा मंदील ?

पायवाटेवर सडे
कोण केशराचे घाली ?
कशी बोगनवेलीची
आज फुलें उमलली ?

रंग रेखली रांगोळी,
मधे चौरंग मांडला,
स्नेह कुणाचा इतुका
नीरांजनीं ओसंडला ?

वर गेंदाचे तोरण,
दारासमोर रांगोळी,
दीपमाळांची आरास,
आज कुणांची दिवाळी ?

तुझ्यावांचून जिव्हाळा
आहे कुणांस अजून ?
तूंच करतेस ताई
सारे लपून छपून.

बघ आलीस आंतून
डोळे दिलेंस झांकून,
आधी कवीता ऐक ना !
माझ्यासमोर बसून.

卐

## चिमुकले पंख तूं माझे

तुझ्या ग नांवगांवाची मलाही काळजी आहे.

कुणाची कामिनी, कन्या असो तूं माय वा भगिनी,
मला वागीश्वरीदूती जणूं साकारली सगुणी,
तिची वीणाच वा वीणेतला झंकार तूं आहे,
तुझ्या ग नांवगांवाची मलाही काळजी आहे.

झळा ज्वालानलाची तूं किती मज भाजले होते,
विखारी शब्दबाणांनी कितीदां टोचले होते,
पुन्हा तूं शीतला, छाया मला आच्छादिले आहे,
तुझ्या ग नांवगांवाची मलाही काळजी आहे.

कितीदां श्याममेघांच्या कडेला तूं उभी असते,
सुगंधी स्नेहजलधारा शिरीं हलकेच रिमझिमते,
धनूंच्या रंगलाटांनी तुला कवटाळिले आहे,
तुझ्या ग नांवगांवाची मलाही काळजी आहे.

पहांटे शुक्र सरतांना उषेचा किरण तूं अरुणा,
यामिनी, श्यामला, संध्या, शरदिनी, पौर्णिमा, तरुणा,
निळ्या पानीं अमिट गाणीं तुझी मी वाचतो आहे,
तुझ्या ग नांवगांवाची मलाही काळजी आहे.

तुझ्या शब्दांतही, मौनांतही, रुसव्यांतही कविता,
तुझ्या हास्यांतही, लास्यांतही, अनुरागही कविता,
कवीची मूर्त प्रतिभा तूं, तुला शतवंदना आहे,
तुझ्या ग  नांवगांवाची मलाही काळजी आहे.

नभाचा ठाव ना लागे, क्षितिजही राहिले मागे,
सभोतीं वादळी वारे, चिमुकले पंख तूं  माझे,
निराकारास भेटाया भरारी घ्यायची आहे,
तुझ्या ग  नांवगांवची मलाही काळजी आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

# एकमेव थेंब होऊं

अवघड उंचीवर
ताई तुला गांठलें ग,
भौतिकाचे भान कसें
एकाएकी पुसलें ग ?

असें कसें ग भेटणें ?
निरानंदाचा आभास,
उभे डोळ्यांत राहणें
आणि भोवतीं सुवास.

सात क्षितिजांपल्याड
पूर्णचंद्र उगवला,
तेजोमय आनंदाचा
स्रोत जणूं उसळला.

तिथें चल ना ग ताई
तूंच घेउनी जा मला,
ओहोळाला गोदावरी
जशी नेते सागराला.

म्हणतात किरणांना
आगळाच नाद आहे,
नादालाही परीमळ,
परीमळा स्वाद आहे.

प्रवासांत अर्धें मधें
हात माझा सोडूं नको,
धाकला मी भाऊ तुझा
पुन्हा दूर लोटूं नको.

सोड साऱ्या विकारांच्या
वसनांची निरगांठ,
घाली स्नान प्रकाशाच्या
प्रपाताच्या प्रवाहांत.

अमर्याद अनंताच्या
दिव्य दर्शनाला जाऊं,
अमृताच्या सागराचा
एकमेव थेंब होऊं.

卐

## केवळ गंधमात्र उरलो

ताई, आज तुझ्यापुढे उतरले भारावले अंबर,
शेजारी बसुनी धरेसम तुझे ओलावु दे अंतर,

राही शिंपित श्रावणासम तुझ्या शब्दांतले मार्दव,
प्रेमाचे हृदयीं तुडुंब भरुनी ओसंडु दे अर्णव,

नेत्रीं इंद्रधनू उभार अवघे उधळून दे वैभव,
सौख्याच्या नगरांत स्नेह फिरतो मांडोनि दीपोत्सव.

काळयाशार नभांतुनी खुदुखुदू तारे हसूं लागले,
लाटांनी लटके रुसून अपणां वेडावुनी दाविले,

वारे रिंगण घालतात अपुल्या भंवती खुळ्यासारखे,
दोघे केवळ गंधमात्र उरलो ह्यांना कसें ठाउके ?

साती सुस्वर पालखी उचलुनी मिरवीत नेती तुला,
धारा एक अनाम ताल धरती; रसिकांपुढे सोहळा.

आतां आपण शांतचित्त असणें, अंतर्मनीं डोलणें,
नादावांचुन गीत गात रमणें, ओठांविना बोलणें,

दृष्टीवीण परस्परां निरखणें, स्पर्शाविना जाणणें,
नानाभावतुषारहारगजरे कंठीं तुझ्या घालणें.

卐

# रस, रंग मला कळलेले

– सौ. उषाताई पेंडसे

अंतःकरणाच्या डोंगरातून खळाळत येणारा हा निर्मळ निर्झर म्हणजे कवि श्री. यशवंत पारखी यांच्या भगिनी–प्रेमाचा मधुर कवितासंग्रह, रक्षाबंधन. निर्मळ, पारदर्शी पाण्याचा, उत्स्फूर्त भावनांच्या जोरदार वेगाचा. वाटेवरल्या कोणत्याही दगडधोंड्यांना न जुमानतां बेलगाम धांवणारा असा हा भावप्रपात आपल्या कांठी अनेक नयनरम्य कल्पनांची कारंजी उडवीत निघाला आहे. त्या चौफेर उडणाऱ्या थेंबांतून मनोरम इंद्रधनुष्य जागोजाग दिसताहेत. कुठे कुठे हे पाणकळे मोत्यांसारखे झगमगताहेत, तर कुठे कुठे ही आर्त वेदना रसिकांचे अंतःकरण ढवळून टाकल्याशिवाय राहत नाही.

या सर्व कवितांतून एक कथासूत्र गुंफून राहिले आहे. कथा अत्यंत सामान्य असून आपल्या नेहमीच्या परिचयाची आहे. एका कलावंत पुरुषाचा एका कलासक्त स्त्रीशी परिचय, त्यांतून मैत्री, हळुवार जिव्हाळ्याची गुंतवणूक, ताटातुटीचा संघर्ष आणि अखेर दोघांचे मनोमीलन.

तर मग यांत वेगळं ते काय ? या कथासूत्रांत खरोखरच एक वेगळेपण असून या कविता नेहमीच्या स्त्री-पुरुष भावबंधांतील कवितांच्या पार्श्वभूमीवर उठून दिसतात. लक्ष्यवेधी ठरतात. मी आजवर मराठी भाषेतील एवढ्या नव्या–जुन्या कविता वाचल्यात. परंतु स्त्रीकडे पाहण्याचा असला दृष्टीकोन मला कुठेही आढळला नाही. कवितेचा एकंदरीत आविर्भाव पाहिला तर हे नक्कीच वाटते की, हे कांही काल्पनिक गूढगुंजन नसून स्वतःच्याच सुखदुःखाचे पदर कवीने उलगडले आहेत.

कथा अशी. नोकरीच्या फेऱ्यात कवि कुठल्याशा लांब खेड्यांत जाऊन पडला. त्या अनोळखी गांवांत त्याच्या प्रतिभेला कोंडून पडावं लागलं. कविता या विषयावर बोलणारा कोणी रसिक आढळेना. मनाच्या अशा तगमगावस्थेत एक स्त्री योगायोगानं त्याला भेटते. कुठेतरी कविता वाचनांत आल्यानं तिने त्याला ओळखले असावे. तिने स्वतःच्या रसिकतेचा परिचय दिला. तिच्या आस्थेनं तो मनोमन सुखावतो. साहजिकच त्यांच्या गांठीभेटी वाढतात. कवीच्या प्रतिभेला पुन्हा धुमारे फुटूं लागतात. त्याच्या कवितांची पहिली वाचक ती असते. त्यांची मैत्री दृढ होते. दोघेही आपल्या मर्यादा ओळखून होती. दोघेही विवाहित, गृहस्थाश्रमी, चारित्र्यवान व शीलवान

होती. वागण्याबोलण्यांत एक खानदानी घरंदाजपणा होता. ती रसिका नव्हे तर कवयित्री. अनेक प्रकारे त्याच्या छंदात रस घेत होती. अंत:करणांपासून त्याच्या रचनांचे कौतुक करीत होती. जिव्हाळ्याने वागवत होती. वाचनीय साहित्याची देवाणघेवाण होत होती. चर्चा, वादविवादातून परस्परांची मतं उकलूं लागली. संकोचाच्या भिंती गळून पडल्या. एक संवेदनाक्षम कवीमन एका सुहृद भावनेला अनुभवत होतं. आपल्या मैत्रिणीबद्दलची हळुवार भावना कवीने 'रक्षाबंधन' ह्या पहिल्याच कवितेत उलगडून ठेवली. त्या सुहृदेला आपली थोरली बहीण म्हणून स्पष्टपणे स्वीकारली. हृदयांतील भावनांना जणु आकार दिला. कारण, बहिणीच्या प्रेमाची जागा त्याच्या आयुष्यांत रिकामी असल्याचे दिसते. हे प्रेम अभावातून निर्माण झाले आहे.

तूं नाही जवळी तरी कुणितरी आहे तुझ्यासारखी,
ताई, तूंच जणू सदा विहरते, डोळ्यांपुढे नेहमी. .. किंवा
कैशी वागतसे बहीण अपुल्या भावाचिया सोबत,
लटके राग, रुसूं, विनोद, हंसणे नव्हते मला माहित...

इतकेच नव्हे तर–

रक्ताची असुनी बहीण इतुकी ना घातली पांखर,
कोठे कौतुक एवढे ? कर कधी आला न पाठीवर.

आपल्या नित्य व्यवहारांतसुद्धा अशी शेकडो उदाहरणे सांपडतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या थोरल्या वहिनीला आई मानलं. कारण त्यांच्या आयुष्यांत मातृप्रेमाची न्यूनता होती. हातापायांच्या ओबडधोबड खुणां असलेल्या दगडाला नाही का आपण गणपती मानून रांगा लावत ? एकलव्याला गुरूची जरूरी होती म्हणून त्यानं मातीच्या प्रतिमेला द्रोणाचार्य मानून शरसाधना केली. तर कुणी कुठे काय मानायचं हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो. संस्कारांचा प्रश्न असतो. कवीने आपल्या मैत्रिणीला बहीण मानलं. यांत अलौकिक, अनैसर्गिक व अस्वाभाविक कांहीच नाही. किंबहुना, त्याच्या प्रशस्त, प्रगल्भ व सुसंस्कारित विचारधारेचं ते द्योतक आहे. पण... पण लोकांचं काय ?... व्हायचं तेच झालं. लोकांनी त्यांची निंदा केली. त्यांच्या मैत्रीचा विपर्यास केला. एक दिवस कुणी निंदकाने तिला जिव्हारी जखम केली असावी. अन्...

अकल्पीत झाले, दुभंगून गेले। बिलोरी महालांतले आरसे,
चुराडा पडे, कांच बोचून पायीं। तुटे पंख सारी गळाली पिसे.

साहजिकच तिने तो सारा राग त्याचेवर काढला.

आम्ही सभ्य, प्रतिष्ठितांत असतो, संसार आहे मला,
जननिंदा विपरीत, लोक हंसती, तुम्ही कसें वागतां ?
नाकळती कविता अम्हांस तुमच्या खोटया, खुळया, वल्गना,
तुम्ही येउ नका पुन्हा मजपुढे, दुसऱ्या कुठे दाखवा.

तो भांबावतो,

माझा काय प्रमाद ? मी तर तुम्हां भगिनीपरी मानितो.' तरीसुद्धा ती, ' भगिनीप्रेम असो तुम्हांस तुमचे लखलाभ आम्हां नको. असे संतापाने म्हणून त्याला साफ तोडून टाकते.

होय; तिने केलं ते योग्यच केलं. उगाच समाजात बेअब्रू होण्यापेक्षा त्याला झिडकारून तोडून टाकलं. वर वर बहीण म्हणून लोचटपणा करणारे पुरुषही कांही कमी ढोंगी नसतात. नुसत्या भावनांनी, भावभरल्या कवितांनी काय होतं ? कविता काय, कशाही करता येतात. वेळीच सावधगिरी दाखवली म्हणून बरं झालं. नाही तर काय ? ... तर फाटक्यात पाय, अशी स्थिती झाली असती.

इथवरची कथा आपल्या नेहमीच्या ओळखीची आहे. कुठल्याही गावांत, घरांत घडणारी आहे. त्यांत अलौकिक असं कांहीच नाही. पण अलौकिक ते असतं ज्याला प्रतिभेच्या दिव्यत्वाचा स्पर्श असतो. ज्या ज्या वस्तुमात्राला प्रतिभेच्या परतत्वाचा स्पर्श झाला ते ते सामान्य झळाळून जगासमोर आलेलं आहे. कोंबडा, मोर, बोकड, कोकिळ, हत्ती या सामान्य प्राण्यांच्या आवाजाला त्या आद्य प्रतिभाशाली संगीतकारानेच संगीतात अमर केलं. प्रतिभावंत चित्रकाराच्या स्पर्शानेच सामान्य रंगरेषांना नयनरम्य आकार दिले. प्रतिभाशाली शिल्पकारांच्या पुनित स्पर्शानेच रानांवनांतल्या दुर्लक्षित दगडांची अजरामर शिल्पं घडलीत. तद्वतच या सर्वसामान्य कथेला कवीच्या प्रतिभेचा स्वर्गीय स्पर्श झाला अन् ही आगळीवेगळी मधूर कविता जन्माला आली. परत परत वाटतं की, खरोखरीच ही कथा घडली असेल तर, धन्य ती स्त्री. आम्हा रसिकांचे तिला सहस्र प्रणाम.

इथं कविता सुरू होते. भावाच्या हट्टी अन् जिद्दी स्वभावाचे दर्शन इथं घडते...

तू तोडिले तरीही मी तोडणार नाही,
अपुले पवित्र नाते मी मोडणार नाही,

किंवा,

जन्म जावो कोरडा अन् ना कुणां कळले तरी,
थोरली भगिनी तुला मी बांधुनी ठेवीन ना.

तो तिला असा सुखासुखी सोडायला तयार नाही. माझ्या भावनांचे तंतू इतके कच्चे नाहीत की, मी तुला लोकांच्या समजुतीसाठी किंवा तुझ्या मर्जीसाठी सोडून देईन, माझं नातं मी माझ्यासाठी जोडलं आहे. उगाच गंमत म्हणून तुला बहीण मानलेलं नाही. नीट डोळसपणे तुझ्याशी नातं जोडलं. माझ्या निष्ठांचीच ही कसोटी आहे. फार तर तुला भेटणार नाही. तुझ्याशी बोलणार नाही. एवढंच काय तर आयुष्यांत कधी तुझं नांवसुद्धा जिभेवर आणणार नाही. लोकांची भिती वाटते ना तुला ? ठीक आहे, पण एकदां जी तुझी प्रतिमा बहिणीच्या रुपानं माझ्या मनांत अवतरली तिलाच जपून ठेवणं, हेच माझं इतिकर्तव्य. हेच माझं समाधान.

सहवास चंदनाचा क्षणकाल लाभलेला,
स्मृतिगंध अंतराला व्यापून राहिलेला,
इतुकेच पुण्य होते...

ताई, एक सुंदर स्वप्न माझ्या मनांत होतं. तुझ्या माझ्या मंगलभेटीचं.

द्वितियेत चंद्र होता. वसुधा समोर भोळी,
तबकांत रत्नज्योती उजळून थांबलेली... पण आतां

ते स्वप्न लोचनांच्या गेले बुडून डोहीं, आणि तरीसुद्धा तुझ्याबद्दल कुठलीही प्रतिशोधाची भावना माझ्या मनांत उद्‌भवत नाही. उलट माझ्या वांटणीला देवाने जे कांही सुख लिहिले असेल ते तुला द्यावं अशीच माझ्या वेड्या मनाची प्रार्थना आहे. तुझा मर्यादाभंग होईल असं माझ्या हातून, शब्दांतून किंवा मनांतून सुद्धा घडलं नाही. केवळ लोकांच्या समाधानासाठी मला अशी जीवघेणी शिक्षा दिलीस. ताई, एकदां निःशंक मनानं माझ्या घरी ये अन् भाई म्हणून मला हांक मार. दुसरं कांहीसुद्धा मला नको आहे.

शेवटी बिजेच्या चंद्रकोरीला व्याकूळ मनाने विनवितो की, आज मला माझ्या प्रिय ताईची खूप आठवण येते आहे. पण ती माझ्यावर रूसली आहे. निदान माझे दोन अश्रू तिला नेऊन दे,

अन सांग तिला की, वाट पाहतो भाई
अर्ध्यांच वेदना ऐकिल्यास तूं ताई
संकोच, अहंता सोडुन सांगायासी
मी वेडा धांवत होतो तुझियापाशी.

नाहीतरी भावाला आपलं सुखदु:ख सांगायला बहिणीपेक्षा उत्तम जागा दुसरीकडे कुठे असते ? निर्मळ जिव्हाळा बहिणीपाशीच असतो. पण लोकांना भ्यायलेली ताई काय परत येणार आहे ? शिवाय तिला असतील की, तिचे भाऊ प्रेम द्यायला. बरोबरच आहे, गरज त्याला आहे.

बहीण कशी आहे? शब्दांतून बहिणीची प्रतिमा कशी साकारते ते बघा.

आषाढासम सांवळे स्वरूप हे स्नेहार्द्र ओथंबलें,
भांगातून उषा गुलाल उधळे, भाळावरी गोंदले,
गंगा मंगल ही उदात्तचरिता, शालीनता, माधुरी
वाणी पुष्पमृदूल आणि शुचिता, गंभीरता, अंतरी.

किंवा दुसऱ्या एका कवितेत,

सतीचे तुझे शील, चारित्र्यसंपन्न । पावित्र्य, शरदांतली पौर्णिमा
तुझे भावसौंदर्य, सौहार्द, माया । नभाचा जणू ओतला नीलिमा
तुझ्या रोमरोमांत स्नेहार्द्रतेचा । असे दाटला सांवळा श्रावण
तुझा शब्द प्राजक्तपुष्पापरी गे । असे आसमंतास भारावुन
स्वभावांत शालीनतेच्या सुगंधी । फुलांनी जणू वांकली मोगरी
तुझ्या व्यक्तिमत्वास वात्सल्यतेचा । किनारा असे रेशमी भर्जरी.

याशिवाय,

नयनांत संथ हेमंत । निर्व्याज, लीन, कुळवंत
उमटून पुन्हा मिटलेले । मृदु हास्य निरागस मंद. . . आणि

'साध्वी, सोज्वळ, चारु, मंगल, ऋजू, निर्व्याज, शामायणी ' अशी प्रासादिक शद्बांची सहजसुंदर गुंफण करीत कवीच्या श्यामलाताईची विलोभनीय पण सात्विक प्रतिमा स्पष्टपणे उभी राहते. अत्यंत सोपी व समर्पक

शद्बयोजना करून कवीनं सुयोग्य प्रतिमानांतून ताईचे शद्बचित्र रेखाटले आहे. अशा श्यामलाताईच्या व्यक्तिमत्वाचा संवेदनाक्षम कवीच्या प्रतिभेला मोह पडल्यास नवल नाही. तो पुढे म्हणतोच की,

उन्हाच्या झळा झोंबलेल्या जिवाला। दिलासा अशी सावली पाहुनी
अशा गार छायेत फुंकून घ्याव्या। कळा अंतरीच्या जरा थांबुनी.

एकदा पालीच्या वल्लाळेश्वराला विचारतो की, देवा माझ्या घरी ताईला केंव्हा धाडशील ? तिनं एकदां तरी आपल्या घरी यावं नि मोकळे-पणानं बोलावं म्हणून तिची वारंवार विनवणी करतो. ताई कबूल होते. उद्यां नक्की येते म्हणते. भावाच्या आनंदाची भरारी मनोरम शद्बांतून व्यक्त होते.

स्वरांच्या पक्ष्यांनो ! हळुंच उतरा फेर धरूनी
मुकी गीते चोची भरुनि मिरवा दूर गगनी
ढगांना जा सांगा, " अरुणसमयी रंग उधळा "
" उद्यां येते " ऐसे मजसि वदली, पर्णकुटिला,

तरी मन नाही नाही त्या शंका काढते. ताई, तू खरंच ये बरं कां ?

निशिगंध शिपुनी ठेविन ठाई ठाई
दारास बांधुनी तोरण हिरवेगार

उजळीन अंगणी ज्योती एक हजार... असं तुझं अभूतपूर्व स्वागत करीन. माझं घर तुला माहेरासारखंच आहे कुठलीही शंका मनात आणूं नकोस. येतांना वाटेवर आजूबाजूला नीट बघशील. कारण,

वाटेवर माझी जिथे आंसवे गळली
तूं बघशिल तेथे रुसल्या बोगनवेली ... पण आतां

तुझी माझी भेट झाल्यानंतर ...

निःश्वास कांपरे स्पर्शतील तुज जेंव्हा
होतील कळयांचे कंठ मोकळे तेंव्हा

लोकांचं जाऊं दे. निदान आपले तर गैरसमज दूर झालेत. आतां पुन्हा आपण पूर्वीसारखे आनंदानं फुलून जाऊं.

'बहिणीचे नाते तूंच अतां सांभाळ' अशी नातं सांभाळण्याची जबाब-दारी तिच्यावरच सोपवून भाऊ तिची वाट पाहतो.

परंतू समाजाला भिऊन असणाऱ्या ताईचं पाऊल त्याच्या भावनांची उत्कटता न जाणल्यामुळे त्याच्या घराकडे वळत नाही. तो अत्यंत निराश होतो. तिच्याच मनांत आपल्याविषयी कटुता आहे. ती आता यापुढे कधीच येणार नाही, याची त्याला खात्री पटते.

तू येशील कधी ? कधी न; ठरलो परकाच मी शेवटी.

किंवा,

हृदयीं तुझ्या परंतू परकाच राहिलेला
तूं जिंकिले अखेरी मी युद्ध हारलेला...

असे म्हणून सपशेल पराभव पत्करतो. मला वाटलं होतं की, कधीतरी माझ्या पवित्र भावनांचा विजय होईल. पण नाही. मी हरलो. तरी हा झेपावता जटायू जिने पंख छाटले तिलाच तिच्याशी झुंजण्यासाठी सामर्थ्य मागतो.

दे तूंच गे तुझ्याशी सामर्थ्य झुंजण्याला.

एक दिवस ताईची भेट होते, पण स्वप्नांत. ताई स्वप्नांत किती छान वागते. किती प्रेमळपणे बोलते. शारदेच्या पुजेसाठी दोघं चांदण्या वेचतात हार गुंफतात. खुळ्या सुगंधालासुद्धा त्यांच्या हृदयांतील निर्मळ भावगंधाचा हेवा वाटतो. भाऊ एक चांदण्यांचा गजरा गुंफून लाजत संकोचत बहिणीच्या केसांत हळूंच माळतो. (येथे हार–गजऱ्याचे रूपक कवितेसाठी आहे.) शारदेच्या पुजेची फुलं भावानं आपल्या केसांत माळल्याचं पाहून ताई अंतर्बाह्य गहिंवरते. त्याच्या निरलस प्रेमाची साक्ष पटून आपल्या भरजरी पदराचा कांठ फाडून भावाच्या हाताला राखी म्हणून बांधते. आपलं पवित्र नातं अभंग ठेवण्याचं वचन देते. पुन्हा पहांटे भेटण्याचं आश्वासन देते अन् भरल्या डोळ्यांनी मावळत्या चंद्रिकेच्या पंखावर बसून निरोप घेते. भावाला जाग येते तेव्हा उशीचा अभ्रा ओलाचिंब झाल्याचं त्याला दिसतं. कवीच्या श्रीमंत कल्पनाशक्तीचा प्रत्यय या कवितेत जागोजागी येतो.

दिवाळी येते. एक एक आनंदाचा दिवस पार पडतो. भाऊबीज येते. ताईची खूप आठवण येत असते. पण ती तर अबोला धरून बसलेली. सागराच्या कांठी उतरलेली सोनेरी सांज पाहून त्याला वाटतं की, ही कोणी वहीण आपल्या भावाला ओवाळायला निघाली आहे. आपल्या ताईनं अशीच लाल पैठणी नेसून यावं अन् आपल्याला ओवाळावं असं मनोमन वाटतं पण

एकाएकी अंधार दाटतो. आसमंतात अन् भावाच्या हृदयांत. ताईचा केवळ आभासच मागे उरतो. भाऊ शेवटी दिव्यांना सांगतो, जा ताईच्या अंगणांत आपली सोनेरी किरणं पसरा. माझी ताई परत परत दारात येऊन माझी वाट पहात असेल. रांगोळी घालून, पाट मांडून भाऊबिजेचा सारा थाट तिने केला असेल. तिला सांगा, आज पहाटेस मी एक मधुर स्वप्न पाहिलं. स्वप्नांत तूं मला चंदनी चौरंगावर बसवून उबदार पाण्यानं स्नान घातलंस. पदरानं हलके हलके माझी पाठ पुसलीस. पाटावर बसवून मला ओवाळलंस. मग मी तुझ्या तबकांत माझ्या अश्रूंची भाऊबीज घातली. तेंव्हा तूं म्हणालीस, 'भाऊराया तुझा किती रे माझ्यावर जिव्हाळा ? हे तुझे अश्रू नसून तुझ्या अंतःसागरांतले मोती आहेत. आकाशगंगेला परिपूर्णता नसते तशीच आपल्या प्रेमाला परिपूर्णता नाही. अनेक जन्म घेऊनसुद्धा ही तहान अतृप्तच राहील.' दिव्यांनो, तिला पुन्हा पुन्हा सांगा की, माझं हे स्वप्न खुळं असूं दे. ते पुढे कधी कधीसुद्धा खरं होणार नसेल तरी माझी विशुद्ध भावना आकाशांतील तेजःपुंज तारकागोलाच्या रुपाने सदैव झममगत राहील आणि त्याचे किरण तुझ्यापर्यंत माझी व्यथा नक्कीच पोचवतील. सभोवार उधाणलेल्या वादळामुळे जरी मी तुला भेटूं शकत नाही तरी वज्राहून अनंत पटीने बलवान असलेल्या माझ्या सद्भावनेने तुझ्या सुखी आयुष्याबद्दल देवाला प्रार्थना करणे, एवढेच केवळ माझ्या हाती उरले आहे. खरंच आहे. रागावली, भांडली तरी सरतेशेवटी ती बहीण आहे. तिचं मंगल चिंतायलाच हवं.

पण ताईचा पत्ता कुठाय अजून ? भाऊ व्याकूळ होऊन म्हणतो,

वर्षामागुन वर्ष चक्रगतिने जातील हे जातिल.
केंव्हा तूं मज भेटण्या परतुनी येशील गे येशिल ?

ताई येणार नसतेच. कारण,

ना जगाची मान्यता. तू संशयाने वेढली,
मी असा परका, खरोखर तूं पुन्हा भ्यालीस ना ?

अबोला असला तरी भावाच्या मनांत ताई नेहमी कुजबुजत असते. दुरावा असला तरी मनांत जणू घर करून बसली आहे. भावाला वाटतं नक्कीच तिनं राखीचं बंधन आपल्याला मनापासून बांधलेलं होतं. म्हणून तर इतकी वर्ष झाली तरी थोरल्या बहिणीचं रुप घेऊन आपल्या मनांत

ती उभी आहे. मग निश्चितच कधी ना कधी तिला माझ्या उत्कट भावना कळतील आणि तिचे पाय तिला माझ्या घरी घेऊन येतील. एखाद्या विषयाच्या ध्यासामुळे आणि सतत चिंतनामुळे मनाला अशी अवस्था प्राप्त होते. आपल्याच मनाचे दोन भाग संवाद सुरू करतात.

आजवर कुणाच्याही जाज्वल्य निष्ठा, अढळ श्रद्धा फुकट गेल्या नाहीत. एक दिवस खरंच ताईची भेट होते. हृद्गंगेच्या कांठावर. ताईला काय सांगू ? किती सांगू ? अशी भावाची अवस्था. खूप दिवसांनी भेटलीस ग ताई. आतांतरी माझ्याशी चांगलं बोल ना. मी माझ्या उत्तुंग ध्येयाप्रत धांवत निघालो आहे. पण या जगांत क्षणोक्षणी अडचणींचे डोंगर वाटेत आडवे उभे आहेत. पुराने भरलेल्या नद्या आडव्या येतात. काय करूं कांही सुचत नाही. ताई, तूं माझ्यासोबत मायेची सावली होऊन रहा म्हणजे मला धीर येईल. या जगाचा व्यवहार बघ कसा खोटा, कठोर अन् स्वार्थी आहे. निरपेक्ष भावनेने माया करणारी तूंच एक आहेस. तू इतके दिवस कुठे होतीस ? थकलेल्या आकाशाला चंदेरी किरणांचा शेला पांघरून त्याचं सांत्वन करणाऱ्या निशेला पाहून मला तुझी रोज आठवण होते. मी रोज तुला स्वप्नांत आठवतो अन् माझ्या ओबडधोबड, मुक्या शब्दांत तुला शोधत असतो. अग आपलं नातं चंद्र–पृथ्वीच्या नात्यासारखं अविनाशी आहे. बहिणीच्या हृदयांत आईपुद्धा लपलेली असतेच. माझ्या पाठीवर प्रेमानं हात फिरवायला, माझे डोळे पुसायला एकदां घरी ये. कधीतरी तुला माझ्या प्रेमाची साक्ष पटेल आणि कळेल की याची भरपाई करणं कठीण आहे. तरी ताई अजून बोलत नाही. खरंच आहे, हा गरुडभराऱ्या घेणारा भाऊ ज्याच्या पंखांत प्रतिभेचं अनिवार बळ आहे अन् ही एक साधीभोळी' सौजन्यशील, शांत अशी गृहिणी असलेली श्यामलाताई, तिचा प्रतिसाद, अंतःकरणांतला उमाळा असा एकाएकी कसा बाहेर दिसणार ? शिवाय मला वाटतं, ती भावाच्या अशा जगावेगळ्या प्रेमानं दडपून गेली असणार म्हणून तिच्या तोंडून शब्द येत नाहीत, भावाला सगळ्या गोष्टींची घाई सुटलेली. तरी ताईनं स्वप्नात सांगून टाकलं होतंच की, तूं भेटलास हे माझं महापुण्यच, पण मला तुझ्यासारखं कवितेतून तर नाहीच पण साध्या गद्य शब्दांतून सुद्धा सांगता यायचं नाही. आणि भाऊ असा तिच्या प्रेमळ शब्दांसाठी अधीर

झालेला. ती बोलत नाही म्हणून गैरसमज करुन बसलेला.

आणि खूप वर्षांनी खरोखरच एक सोन्याचा दिवस उगवतो. खरोखरीच ताई स्वत:हून सामोरी येते, हंसते अन् बोलतेसुद्धा, त्याची, त्याच्या कवितांची आस्थेनं चौकशी करते, पण तिला नीट सुसंबद्ध बोलणं जमत नसतेच. स्वाभाविकच आहे. बोलतां बोलतां त्यांच्या कवितांचं इंगित कळल्याचं सांगते. सारे बारकावे कौशल्याने टिपून नेमक्या शब्दांत व्यक्त करण्याचं कवीचं कसब वाखाणण्यासारखं आहे.

आज कितीक वर्षांनं । ताई भेटली, हांसली
जशी मंदीरासमोर । दीपमाळ प्रकाशली
ताई उगाच बोलते । खरें डोळयांत बोलणे
जसे धूसर धुक्यांत । कोजागिरीचे चांदणे.

अशी ताईची मनोवस्था पाहून भावालासुद्धा आपला आनंद असह्य होतो.

मन चिंब ओथंबले । पुरे, नको ना बोलूंस
तुझ्या शब्दांतून ताई । भुरभुरतो पाऊस

दोघेही मधल्या काळातली कटुता विसरून गेलेले असतात.

गेला आषाढ–श्रावण । सारे मळभ संपले
मार्गशीर्षातले ऊन्ह । ऊसमळयांत सांडले

त्या भावनेनं भिजलेल्या क्षणी बहिणीचा प्रेमळ हात भावाच्या पाठीवर फिरतो.

ऊबदार ऊन्ह कसे । मऊ पिवळे पिवळे
माझ्या पाठीस ताईचे । तळहातचि कोवळे

आनंद किंवा दु:ख अनुभवतांना आपल्या मनांत नेमके कोणते तरंग उठतात याची नोंद करणारा एक तटस्थ कप्पा कविमनात असला पाहिजे. अर्थात हा मानसशास्त्रीय विषय आहे. तर ही संपूर्ण कविताच अप्रतिम दृष्टांतांनी नटलेली आहे. पोपटी भातशेत वाऱ्यावर हेलकावतं तशी भावाच्या हृदयाच्या हिंदोळयावर ताई उंच उंच झोके घेते. कवि (भाऊ) म्हणतो, ताई तुझा झोका उंच सात आकाशाच्या पलीकडे सरस्वतीमातेच्या मंदिरात पोचूं दे. माझं साधंसुधं गीत तुझ्या पदराला मी बांधून ठेवलं आहे. ते

मातेच्या चरणी वाहून तिला माझे वारंवार वंदन सांग, आणि येतांना माझ्या प्रतिभेसाठी प्रणवाचे मोरपीस व माझ्या वैखरीसाठी अनाहत स्वरांचा साज घेऊन ये. शेवटी कवि म्हणतो, ताई आकाशांत जरा थांबून मला बांधायला इंद्रधनुष्याची सप्तरंगी राखी घेऊन ये. प्रणवाचे मोरपीस आणि अनाहत स्वरांचा साज मागणारी ही कविता जरा आध्यात्माकडे झुकल्यासारखी वाटते. हा कल पुढील कवितांतून स्पष्टपणे जाणवतो. वाचकाला सोबत ओढून नेण्याचं सामर्थ्य कवीच्या शब्दांशब्दांत प्रगटते.

आता अवघा प्रेमाचा प्रसंग पहा. भावाजवळ बहीण त्याच्या पाठीवर मायेनं हात फिरवत बसलेली आहे.

किनाऱ्याला लाटा कुशल पुसती फेनधवला
शिरी अंधाराच्या कर फिरविती वत्सलदिशा
जसा आकाशाचा गहिंवर पुसे श्याम रजनी
तुझा माझ्या पाठीवरति फिरतो हात भगिनी.

पुढे म्हणतो, ताई तूं अशीच माझ्या हृदयांत शतकानुशतके रहा. तुझी गाणीं सदव माझ्या ओठांवर राहोत. जगाच्या बाजारांत असले प्रेम कुठे मिळते ? माझं महापुण्य म्हणून तूं मला भेटलीस. माझी मनोव्यथा हलकी करायला मायेची जागा लाभली.

व्यथा आषाढाच्या धरणि हृदयांतून दडवी
जरा माझे अश्रू पुसुनि मज पंखात लपवी
सुगंधाची स्वप्नें बघत सुकल्या मुग्ध कलिका
पुन्हा ताई पाठीवरति फिरवी हात हलका.

इतक्या वर्षानंतर भेटलेल्या ताईनं पाठीवरचा हात काढूंच नये असं भावाला वाटणं साहजिकच आहे; आणि आजवर कोंडून राहिलेलं भावाच्या अंतःकरणांतलं दुःख उफाळून बाहेर येतं.

ताई, आजवरी जिवंत मरणा माझ्याच मी भोगिले
माझ्या थंड शवास मी उचलुनी सरणावरी ठेविले
तेंव्हा शांतवनास मी मजपुढे बसलो सखा होऊनी
आलींगूनि मला क्षणैक रडलो, आलो घरी घेऊनी.

या रणरणत्या उन्हांत तूंच गारवेलीसारखी वाटेत उभी दिसलीस.

आणि मी तुझ्या सावलीला आलो. या जगांतले ऐश्वर्य, लौकिक व मानपान कांही कांहीसुद्धा मला नको आहे. तुझ्याजवळ सारा मोठेपणा विसरून एका लहानग्या शिशूसारखा मी उभा आहे. तू माझ्याजवळ निःशंकपणे बसून बोल. ताई, मला खूप भूक लागली आहे ग ! तुझ्या हातांनी रांधून मला दहि-भातावर साय घालून जेवायला वाढ. या निष्ठूर, वेगडी जगापासून दूर तुझ्या हिरव्यागार कोंवळ्या पानांत मला झांकून घे. प्रौढत्वी निज शैशवास जपणे ... कवी आपले बालमन ताईपुढे उभे करण्यांत यशस्वी झाला आहे.

भावाच्या हृदयांतील अनेक हळवे आविष्कार समर्थपणे व्यक्त झाल्या-मुळे असे वाटते की, हे सारे अनुभवजन्य असावे आणि कवीची ताई खरो-खरच वास्तव असेल तर तिने कवीच्या भावविश्वांत अत्यंत दिव्य असे स्वरूप धारण केले आहे याची साक्ष पुढील 'चिमुकले पंख तू माझे' या कवितेत येते. तूं कुणाची कन्या, पत्नी, माता, भगिनी का असेना, मला मात्र तूं देवी शारदेनं पाठविलेल्या परममंगल दिव्य दूतीच्या स्वरूपांत दिस-तेस. या विश्वांतील अनेकविध आनंदमय अनंतरूपांत तूं मला भेटतेस. तुझ्या नांवगांवाची मलाही काळजी वाटते, तुला काय नांव देऊं ? पण खरं म्हणजे तूं माझ्या प्रतिभेचे चिमुकले पंख आहेस. तुझ्या बळावरच केवळ चैतन्यमय अशा निराकाराला भेटायला मला भरारी घ्यायची आहे. कला-वंत कधीच तृप्त नसतो. नवी क्षितिजे त्याला सतत खुणावत असतात. अधिकाधिक उंची गाठण्याचा कलावंताचा स्थायीभाव येथे प्रगट होतो.

वहिणीच्या प्रतिमेचे पूर्ण विकसित दर्शन पुढील 'एकमेव थेंब होऊं' या कवितेत घडते. ताईची भेट म्हणजे ध्यानावस्थेचं वर्णन आहे.

असें कसें ग भेटणे । निरानंदाचा आभास
उभे डोळ्यांत राहणे । आणि भोवती सुवास

या भेटीत कवीचे भौतिकाचे भान लोपले आहे. दिव्य चैतन्याचा त्याला दूरवर आभास होतो. त्या चैतन्याप्रत नेण्यासाठी तो आपल्या ताईला विनवतो.

तिथे चल ना ग ताई । तूंच घेऊनी जा मला
ओहोळाला गोदावरी । जशी नेते सागराला

तूं तुझ्यांत सामावून मला तिथे घेऊन जा. प्रकाशाच्या धारेखाली

साऱ्या विकारवसनांची निरगांठ सोडून मला सचैल स्नान घाल. नंतर आपण अमर्याद अनंताच्या दर्शनाला जाऊं अन् अमृताच्या सागरांतील दोघेही एकच थेंब होऊन राहूं, जीवाला असलेली शिवाच्या भेटीची आस अशा रितीने द्वैत संपून अद्वैतात सफल होते. कधी वाटते की, कवीची ताई अशरिरी असावी, केवळ भावनामय असावी. संग्रहातील शेवटच्या ५-६ कवितांतून ताईचे अशरिरी अस्तित्वच केवळ जाणवत राहते.

अखेरच्या 'केवळ गंधमात्र उरलो' या कवितेत कवी पुन्हा भानावर येऊन म्हणतो, ताई, आज मी माझे दुःखाने भरलेले अंतःकरण तुझ्यापाशी निःशंकपणे उघडे केले. सारा संकोच सोडून तू माझ्या शेजारी बसून रहा. धरती जशी आभाळाची आसवं स्वतःत सामावून घेते तशीच तूंही माझ्या अश्रूंनी ओली हो. तुझ्या स्निग्ध नजरेनं माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करीत रहा. सौख्याच्या महानगरांत तुझामाझा अकृत्रिम स्नेह परमानंदाचे दीप लावीत दिवाळी साजरी करीत आहे. ताई आपला अबोला लटकाच होता. आपलं खरोखरच परस्परांवर निर्हेतुक प्रेम आहे. आपली शरीरं गळून केवळ सुगंधमात्र असलेला सात्विक सौहार्दभाव पाहून वारे आपल्याभोवती रिंगण धरताहेत. आता हा सुगंध दाही दिशांना पसरेल. अशा परमसुखाच्या क्षणी कवी आपल्या लाडक्या श्यामलाताईला सप्तसुरांच्या पालखीत बसवून वर्षाधारांच्या तालावर मिरवत मिरवत रसिकांच्या भेटीला आणतो आहे. आपणही नकळत ह्या आनंदसोहळ्यात सामील होतो. आणि त्या अमृतमय आनंदाशी समरस होतो न होतो तोंच हे बहिणभाऊ शांतपणे परस्परांत विरघळून गेलेले दिसतात. कवी येथे एक अनंत सत्य बोलून जातो. तो ताईला म्हणतो,

आतां आपण शांतचित्त असणे, अंतर्मनी डोलणे'
नादांवाचुन गीत गात रमणे, ओठांविना बोलणे,
दृष्टीवीण परस्परां निरखणे, स्पर्शाविना जाणणे,
नाना भावतुषारहारगजरे कंठी तुझ्या घालणे.

आणि सुशांत, प्रेममय केवळ अद्वैतांत ही आनंदयात्रा संपते. उरलं आहे ते केवळ सोलीव, गाळीव, निखळ प्रेम.

अद्वैत प्रेमाचा साक्षात्कार म्हणतात तो हाच असावा. नाहीतरी सगुण

साकाराची पूजा करतां करतांच निर्गुण निराकारांत विरून जायचं असतं. प्रेमाला प्रेमोपचारांची पूजा प्रेमानंच पोचवायची असते. मीरेला प्रियकराच्या रूपांत, ज्ञानेश्वरांना निखळ ज्ञानाच्या रूपांत, नामदेव तुकारामादि संतकवींना विठूमाऊलीच्या रूपांत, स्वातंत्र्यवीरांना मातृभूमीच्या रूपांत याशिवाय अनेकांना अनेक रूपांत अज्ञाताचे दर्शन झाले, परंतु बहिणीच्या रूपांत घडलेले अज्ञाताचे प्रियतमदर्शन हेच एकमेव असावे असे धाडस करून म्हणावेसे वाटते.

कविवर्य पारखींची कविता संघर्षातून सफलतेकडे, निराशेतून आशेकडे, सगुणाकडून निर्गुणाकडे धांवते आहे. ही गतिमानता त्यांच्या वैचारिक विकसनशीलतेतून आलेली आहे. दुसरा एक महत्त्वाचा विचार असा की, महान विषयावर कविता लिहिणे सोपे असते. भगवंताचे स्तुतिस्तोत्र, शिवाजीवर लिहिलेले लेखन, श्रीराम, श्रीकृष्णावर केलेले लेखन सोपे असते कारण ते मूळांतच महान असतात. परंतु सर्वसामान्य वस्तुविषयाला हात घालून अशी श्रेष्ठ रसनिर्मिती करायला तसलीच श्रेष्ठ दृष्टी हवी. तसल्याच उंचीवरून त्या सामान्य वस्तूकडे पाहिल्याशिवाय त्यांतील सौंदर्य प्रतीत होत नाही. त्यांतील असामान्यत्व कळत नाही. डोंगरावरून झाडं, शेतं, रस्ते किती सुंदर दिसतात. ? एक भाबडेपणाचा आरोप होण्यासारखा असला तरी मी म्हणते आपण आपल्या कुटुंबातील प्रिय व्यक्तींकडे भावड्या प्रेमानंच पहातो, त्यांच्या गुणांवगुणांचा विचार न करतां, सुरुपता वा कुरुपतेचा विचार न येतां ते आपल्याला सुंदर दिसतात. जीवविज्ञानाचे आणि सौंदर्यशास्त्राचे नियम आपण कधी लावतो का? असो.

पारखींच्या रचना छंदोबद्ध, लयबद्ध आहेत हे विशेष. दिंडी, शार्दूलक्रिडीत, सुमंदारमाला, शिखरिणी, अष्टपदी, वसंततिलका, मंदाक्रांता आणि गझल यातून रचना करणे सोपे नाही. त्यासाठी शब्दभांडार हवे असते. शब्दांच्या अर्थछटांची जाण हवी असते आणि यशवंत पारखीजवळ हे सर्व जन्मजात आहे. त्यांचे शिक्षण मॅट्रिकच्या पुढे नाही. जाणीवपूर्वक अभ्यास म्हणून त्यांनी कांही वाचन वा लेखन केलेले नाही. त्यांच्या रचनांत कल्पनाविलास, दृष्टांत, उपमा, अनुप्रास वगैरे सहजपणे व स्पष्टपणे उमटतात. काय सांगायचं ते अत्यंत सोप्या व समर्पक शब्दांतून सुस्पष्ट चित्ररुपाने ते

क्षणार्धात उभे करतात. वाचक त्यांची रसाळ कविता ऐकतां, वाचतांना केवळ त्यांच्या अनुभूतीशी समरस होत नाहीत तर त्यांच्याबरोबर गुणगुणू लागतात त्यांच्या कविता वाचकांच्या पक्क्या लक्षांत राहतात. हे इतरत्र आजकाल क्वचित आढळते. याचं पारखींनी सांगितलेलं कारण मजेदार आहे. ते म्हणतात मी कविता लिहिण्यासाठी टेबलखुर्ची कधीच वापरत नाही, झोपाळ्यावर झोके घेत गुणगुणत कविता रचतो.

पारखी हळव्या भावप्रवाहांत गळयापर्यंत बुडून नुसते वहात जातात. त्यांच्या कवितेवर लिहिताना माझासुद्धा हात कांठापासून सुटतो आहेसे वाटते. प्रस्तुत कविता संग्रहांतील अनेक सौदर्यस्थळांचा आस्वाद घेण्याचा मोह होतो. परंतु केवळ विस्तारभयास्तव आता आवरते घेते. मैत्रिणीच्या प्रतिभेचा हळुहळू विकास होत होत भगिनी, मातां, स्फूर्तिदायी प्रतिभा आणि शेवटी केवळ आनंदमय चैतन्यांत परिणती यांत कवीच्या विचारांचेच उत्तरोत्तर विकसित दर्शन घडते. कवि निराश होऊन गळयापर्यंत दुःखांत बुडत असतानांसुद्धा आपल्या निष्ठेसाठी कधी तडजोड करतांना दिसत नाही. एक सूत्र धरून एवढया कविता लिहिणं म्हणजे ज्यांना स्वतःचे सूर सांपडले त्यांचंच काम आहे. वर्षांनुवर्ष अजिठयाची लेणी कोरणाऱ्यांच्या कुळांतल्या निष्ठावंतांचं काम आहे. भाषेचे सौदर्य, विचारांची उत्तुंगता, प्रासादिक शब्दांची पखरण, मनोरम कल्पनांची पेरणी आणि अंतःकरणाला थेट भिडणारी भावुकता हे या कवितेचे गुण आहेत. या सर्व कवितांतून एक हळवा, शांत, सात्विक भाव सर्वदूर पसरून राहिला आहे. पारखींना सहजपणे कविता स्फुरते. ते आपल्या अनुभूतीशी प्रामाणिक आहेत तसेच त्यांचे शब्दही अनुभूतीशी प्रामाणिक आहेत. या ठिकाणी प्रसिद्ध आंग्ल कवि शेले यांनी केलेली कवितेची व्याख्या आठवते. Poetry is the record of the happiest & best moments of the happiest & best minds. पारखींचीं कुठल्याही इझम् किंवा वादाशी बांधिलकी नाही. कुठलाही गट नाही. अन्याय झाला म्हणून प्रतिशोध, चिडून विद्रोह वगैरे नाही की कुठला तत्त्वज्ञाचा आव नाही, स्वतःच्या कवितेचे सार्थ रसग्रहण करणे किंवा त्यावर चर्चा करणेसुद्धा त्यांना जमत नाही. पारखीना साऱ्या कविता मुखोद्गत आहेत हे एक विशेष. दुर्बोधता ह्या कवितांच्या कुठे वाऱ्यालाही उभी राहत नाही. हल्ली प्रचलित असलेल्या शब्दकोडयासारख्या दुर्बोध गद्य कवितांच्या वैतागवाडीत

पारखींची कविता म्हणजे त्यांच्याच शब्दांत, सुवर्णाच्या वृंदावनि तुळसीचे रोप रुजले। अशी आहे. पारखींचे त्यांच्या श्यामलाताईवरचे प्रेम आणि कवितेवरील प्रेम या दोन्ही गंगांचा येथे मनोज्ञ संगम झाला आहे. या कवितांच्या रुपाने त्यांनी खरोखरीच भगिनीप्रेमाची केशरी ध्वजा मेघांच्या शिखरावर चढून आकाशमाथ्यावर रोवून फडकत ठेवली आहे. वास्तवतेच्या नांवाखाली जिथे माणूस माणसाची ओळख, घरांतील, नात्यांतील जिव्हाळा विसरत चालला आहे. रोज वखवखलेले, वासनेने बरबटलेले उत्तान साहित्य कथा, कविता, कादंबऱ्या, नाटके व सिनेमा यांतून आमच्यावर लादले जात असतांना बहिणीच्या प्रेमाची कविता क्वचितच कुणाला आवडेल अशीही शंका येते. भांगेतल्या तुळसीला कोण विचारतो ?

श्री. पारखींच्या कवितेत दोषही आहेतच. कांही कांही कविता फार लांब झाल्या आहेत. तर कांही ओळी एकदम गद्य वाटतात. उदाहरणार्थ,

ना आलीस तरी कुठे बिघडते आयुष्य माझे तुझे ?
प्रत्यक्षांत नसेल भेट नशिबी स्वप्नांतूनी होतसे ।
माझे मित्र किती तुझ्यासम कुणी नाही कधी कष्टले ।

नको दुष्ट शंका मनातून आणू । मला तूंच ताई महन्मंगले ... वगैरे शिवाय अनेक ठिकाणी एकच एक पुनरुक्ति आढळते म्हणजे ताई ये. तूं केंव्हा येशील ? माझ्या पाठीवर हात फिरव, माझे अश्रू पूस वगैरे वगैरे.

सरतेशेवटी साऱ्या कवितांचे श्रेय कवीने आपल्या ताईलाच दिले आहे. लपून छपून ताई तूंच माझ्या कविता सजवल्यास नि मला मानाचा मंदील बांधलास असे विनम्रभावनेने ते कबूल करतात. या कवितेतसुद्धा एक गंमत आहे. त्यांच्या सत्काराची तयारी करणाऱ्या ताईला कविता ऐकवण्याची त्यांना घाई झाली आहे.

बघ आलीस आंतून । डोळे दिलेस झांकून
आधी कविता ऐक ना । माझ्या समोर बसून ... नाहीतरी

पारखी कवितेपुढे सारे विसरलेलेच असतात.

कविवर्य श्री. यशवंत पारखी यांचा रक्षाबंधन हा दुसरा कवितासंग्रह पहिला पुष्पगंधा १९६६ साली प्रसिद्ध झाला. त्यांतील कवीची दृष्टी म्हणजे एका लहान मुलासारखी सगळीकडे भिरभिरत राहणारी, अनुभवशून्य अशी

आहे. त्यांतले कवित्व मान्य करूनही अपरिपक्वता स्पष्टपणे जाणवते. १५ वर्षांनंतरच्या या संग्रहात पंख स्थिरावले नसले तरी निश्चित दिशा सांपडल्याचे दिसते. शिवाय आषाढ–श्रावण हा त्यांचा तिसरा संग्रह प्रकाशनाचे वाटेवर आहे. त्यांतील बांधेसूद निसर्गचित्रणं अप्रतिम आहेत. पारखींच्या तोंडून कविता ऐकणे म्हणजे एक पर्वणी असते. त्यांच्या अनेक म्हणजे शेकड्यांनी कविता आजवर सत्यकथा, किर्लोस्कर, वसंत, लोकप्रभा, वाङ्मयशोभा, विवेक व इतर अनेक मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. आकाशवाणी नागपूर व मुंबई केंद्रावरून साहित्य सौरभसारख्या कार्यक्रमांतून त्यांची हजेरी अनेकदां लागली आहे. भावसरगमसारख्या कार्यक्रमांतून रामदास कामत, विठ्ठल शिंदे, पुष्पा पागधरे व वर्षा आंबेकर यांनी त्यांच्या गीतांचे गायन केले. अनेक स्पर्धांतून त्यांना बक्षिसें मिळाली आहेत. तर खाजगी व सार्वजनिक कविसंमेलनात त्यांची कविता रसिकांना भिडत असते. परंतु त्यांना प्रकाशक मात्र मिळत नाहीत. बाजारहाटांतले राजकारणी व व्यवहारी डावपेच वेगळेच असतात. साहित्य मंडळांबद्दल न बोलणे बरे. पारखी स्वतः पदरमोड करून मुलीचं लग्न करावं त्या हौसेनं कवितेच करतात. सगळी भलीबुरी वादळं भेदण्याचं सामर्थ्य त्यांच्या दुर्दम्य संकल्पशक्तीत व प्रगाढ कविताप्रेमांत असावं. आपण सर्व रसिक मिळून योग्य त्या, शक्य त्या मार्गाने त्यांच्या मुलीचं, कवितेचं स्वागत करूं या.

गुढी पाडवा
चैत्र शुद्ध प्रतिपदा
शके १९०६
दि. २ एप्रिल १९८४

**सौ. उषाताई पेंडसे**
लक्ष्मीनिवास, कुंटे बिल्डिंग
ब्राह्मण सोसायटी, नौपाडा, ठाणे २

म. ठा. ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९४
दा. क्र. २७३६२
काव्य १५९०
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)



यशवंत पारखी हे वृत्तरचना करतात. ही गोष्ट मला अर्थातच अभिनंदनीय वाटते. नव्या मुक्त रचनेचा स्वीकार करण्याच्या उत्साह भरांत अनेक नवे कवी जुन्या वृत्तरचनेबाबत अनभिज्ञ राहिले आहेत. आणि तशा रचनेलाही तिचे म्हणून एक सौंदर्य असते या गोष्टीचा त्यांना विसर पडला आहे. यामुळे एकूण मराठी कविता आपले कांही चांगले गुण-विशेष पूर्णतः गमावून बसेल की काय अशी भीती वाटू लागली आहे. या पार्श्वभूमीवर पारखी यांची वृत्तबद्ध रचना मन विशेष ओढून घेते. शार्दूलविक्रीडित, मंदाक्रांता. शिखरिणी, मालिनी, सुमंदारमाला अशो अवघड अक्षरगणवृत्ते पारखी फार सफाईने हाताळतात -- शांता शेळके

एक सूत्र धरून एवढया कविता लिहिणं म्हणजे ज्यांना स्वतःचे सूर सांपडले त्यांचंच काम आहे. वर्षानुवर्ष अजिंठ्याची लेणी कोरणाऱ्यांच्या कुळांतल्या निष्ठावंतांचं काम आहे. भाषेचे सौदर्य, विचारांची उत्तुंगता, प्रासादिक शब्दांची पखरण, मनोरम कल्पनांची पेरणी आणि अंतःकरणाला थेट भिडणारी भावुकता हे या कवितेचे गुण आहेत. या सर्व कवितांतून एक हळवा, शांत, सात्विक भाव सर्वदूर पसरून राहिला आहे.

पारखींची कविता म्हणजे त्यांच्याच शब्दांत, सुवर्णाच्या वृंदावनि तुळसीचे रोप रुजले । अशी आहे. पारखींचे त्यांच्या श्यामलाताईवरचे प्रेम आणि कवितेवरील प्रेम या दोन्ही गंगांचा येथे मनोज्ञ संगम झाला आहे. या कवितांच्या रुपाने त्यांनी खरोखरीच भगिनीप्रेमाची केशरी ध्वजा मेघांच्या शिखरावर चढून आकाशमाथ्यावर रोवून फडकत ठेवली आहे.

– सौ. उषाताई पेंडसे

REFBK-0024362
REFBK-0024362